# अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा इतिहास

**नीता जगताप**

**समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे**

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**

**पुणे.**

**उपोद्घात:**

सहकारी चळवळीच्या संदर्भात अहमदनगर जिल्ह्याने इतिहसात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. अशिया खंडातील सहकारी साखर कारखानदारीचा पाया अहमदनगर जिल्ह्यात घातला गेला. सन १९४९ मध्ये पुणे येथील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेचे संचालक धनंजयराव गाडगीळ यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या सहकार्याने श्रीरामपूर तालुक्यात प्रवरानगर येथे सहकारी तत्वावर साखर कारखाना उभारला. त्यानंतर अहमदनगर जिल्ह्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांचे जाळे उभे राहिले. गेल्या पन्नास वर्षापेक्षा अधिक काळ अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी कार्यक्षमतेने उभी असल्याचे दिसून येते. सहकारी साखर कारखानदारी हा घटक अहमदनगर जिल्ह्याच्या संदर्भात प्रकर्षाने समोर येत असला तरी सुध्दा जिल्ह्यातील सहकारी चळवळ फक्त साखर कारखानदारीपुरतीच मर्यादित राहिली नसल्याचे दिसून येते कारण इतर अनेक क्षेत्रात सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यात काम झाल्याचा इतिहास आहे.

**सहकारी शेती:**

सहकारी शेती, सहकारी पतपेढ्या, सहकारी वाहतूक संस्था, सहकारी वीज वितरण संस्था, सहकारी कृषी बाजारपेठा, सहकारी सुत गिरण्या, सहकारी गोदामे आणि शितगृहे इत्यादी अनेक क्षेत्रात सहकारी चळवळीने अहमदनगर जिल्ह्याच्या परिसरात आपला ठसा उमटविल्याचा इतिहास आहे. धारण क्षेत्राचे अत्यंत छोटे आकारमान आणि विभाजन व तुकडीकरण होत गेल्यामुळे शेतीचा किफायतशीरपणा घसरत गेला. कारण छोट्या आकारमानाच्या जमीनीवर आधुनिक यंत्रांचा व पाणी पुरवठ्यांच्या साधनांचा वापर करणे शक्य नव्हते. त्यासाठी लोकांना सहकारी शेतीचा मार्ग सापडल्याचे दिसून येते. आधुनिक पध्दतीच्या शेतीसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कृषी सहकारी संस्था स्थापन केल्याचा इतिहास सापडतो. सहकारी शेतीमध्ये सर्व शेतकरी आपली छोटी-छोटी धारण क्षेत्रे एकत्र करून शेतीचे व्यवस्थापन करत असत. अशा प्रकारच्या शेती व्यवस्थेमुळे लोकांना कर्ज मिळणे, आधुनिक साधनांचा वापर करणे व जास्त उत्पादन घेणे शक्य झाले. त्यामुळे लोकांना किफायतशीर शेतीचा एक चांगला मार्ग सापडला.

साधारणपणे, स्वातंत्र्यांच्या सुरूवातीच्या काही वर्षामध्ये अशा प्रकारची कृषी व्यस्था अस्तित्वात आल्याची नोंद आपल्याला जिल्ह्याच्या इतिहासात सापडते. भारताच्या इतर प्रांतामध्ये सुध्दा सहकारी शेतीचे प्रयोग झाल्याचा इतिहास आहे. परंतु याकामी अहमदनगर जिल्ह्याइतके यश मात्र मिळू शकले नाही. किंबहूना अशा सहकारी संस्था इतर प्रांतामध्ये दिर्घकाळ टिकाव सुद्धा धरू शकल्या नाहीत.

सन १९६८-६९ साली अहमदनगर जिल्ह्यामध्ये १८ शेती सहकारी संस्था अस्तित्वात होत्या. त्यांचे भाग भांडवल, सभासद संख्या, कर्ज वाटप इत्यादींचा इतिहास पाहिला तर आपल्याला उल्लेखनिय प्रगती केल्याच्या नोंदी सापडतात. सहकारी कृषी संस्थांशिवाय सन १९६८-६९ साली अहमदनगर जिल्ह्यात दहा सहकारी पाणी पुरवठा संस्था सुध्दा अस्तित्वात होत्या. अशा पाणी पुरवठा संस्थांच्या कार्याबाबत सविस्तर आकडेवारी सुध्द उपलब्ध आहेत.

**सहकारी पाणी पुरवठा संस्था:**

सन १९६८-६९ साली अहमदनगर जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या दहा सहकारी पाणी पुरवठा संस्थांची एकूण सभासद संख्या ७१६ तर, त्यांचे भाग भांडवल १६५३१० रुपये एवढे होते. या संस्थांकडे असणारा राखीव निधी सुध्द पर्याप्त होता. तर त्यांना सरकारकडून मिळालेली एकूण कर्जे ३०६०४३ रुपये एवढी होती. सरकारने या संस्थांना १७९२४९ रुपये एवढे अनुदान देऊन आर्थिदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्या काळात सुध्दा या सर्व संस्थांचे मिळून एकूण चालू भांडवल ५७८३१० रुपये एवढे होते. या सर्व घटकांच्या आधारावर या संस्थांनी एकूण ६२६२५ एकर इतक्या शेतीसाठी पाणीपुरवठ्याची सोय उपलब्ध करून दिली होती. विशेष म्हणजे या संस्थांना रुपये ३१३५४ इतका नफा झाल्याची नोंद आपल्याला सापडते.

भारतासारख्या त्याकाळी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या देशामध्ये आर्थिक विकासाबरोबर सामाजिक बदल घडवून आणणे सुध्दा अत्यंत महत्वाचे होते. यासाठी लोकांचा सर्वसमावेशक विकास होणे सुध्दा आवश्यक होते. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने समाजविकासाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करून जिल्ह्याच्या आर्थिक सामाजिक आणि राजकीय इतिहसात आपले स्थान निर्माण केल्याचे मान्य करावे लागेल. सहकारी शेती उत्पादन, विपणन, साखर उद्योग, बॅकींग, वितरण व्यवस्था इत्यादी क्षेत्रात जिल्ह्याच्या सहकारी चळवळीने प्रामाणिकपणे कार्य केल्याचा इतिहास आहे.

स्वातंत्र्याच्या अगदी सुरूवातीच्या काळात सुध्दा सहकारी कृषीच्या क्षेत्रात अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी चांगली प्रगती केली होती. विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे, सहकारी तत्वावर शेती केल्याने भारतासारख्या अप्रगत शेतीला सुध्दा नफा प्राप्त होवू शकतो. याबाबत शेतकऱ्यांना एक प्रकारे खात्री मिळाली. अशा प्रकारच्या ऐतिहासिक अनुभवामुळे अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रात अनेक प्रकारचे नवनवीन प्रयोग होऊन ते यशस्वी झाल्याचे आपणास दिसून येतात.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात कार्यरत असणाऱ्या अनेक सहकारी संस्थांचा इतिहास सापडत असला तरी सुध्दा अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीची खरी सुरूवात सन १९०९ साली झाल्याचा झाली होती. सन १९०९ साली सुरू झालेल्या सहकार चळवळीने अहमदनगर जिल्ह्यात सन १९४७ पर्यंत खुपच प्रगती साधल्याचे दिसून येते. परंतु चळवळीला खरा वेग प्राप्त झाला तो म्हणजे स्वातंत्र्या नंतरच. स्वातंत्र्यानंतर नियोजन काळात ग्रामीण विकासाचा एक मार्ग म्हणून सहकारी चळवळीकडे सरकार तसेच जिल्ह्यातील लोकांनी विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता सातत्याने दुष्काळाच्या सावटाखाली असणाऱ्या या जिल्ह्याच्या सर्व समावेशक प्रगती मध्ये सहकारी साखर कारखानदारने अत्यंत महत्वाचे योगदान दिले. सहकारी साखर चळवळीने तर जिल्ह्याच्या विकास कामात आणि शेती विकासामध्ये दिलेले योगदान इतर कोणत्याही घटकाने केले नाही तसेच आपणास या जिल्ह्याचा आर्थिक आणि सामाजिक विकास सांगतो. उत्तर अहमदनगर जिल्हा म्हणजे

कोपरगाव, श्रीरामपूर, संगमनेर, राहूरी, अहमदनगर, नेवासा या तालुक्यांच्या विकास कामात तर सहकारी चळवहीने गेल्या पन्नास वर्षात केलेले योगदान एकमेवाद्वितीय मानावे लागेल.

**जिल्ह्यातील सहकारी बॅकींग चळवळीचा इतिहास:**

कृषी क्षेत्र आणि सहकारी कारखानदारी तसेच ग्रामीण उद्योगधंद्याच्या विकासकामाला गती प्राप्त करून देण्याचे काम जिल्ह्यातील सहकारी बॅकींग चळवळीने केल्याच्या नोंदी या जिल्ह्याच्या इतिहासात पदोपदी सापडतात. जिल्ह्यातील सर्व सहकारी बॅकींग क्षेत्रावर नियंत्रण ठेवणाऱ्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेची स्थापना सन १९१० साली करण्यात आली. स्थापनेपासूनच या बॅकेने इतर सर्व सहकारी संस्था व कारखाने यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्याचे कार्य केले. सन १९६२ सालापासून जिल्हा परिषद सुध्दा आपले आर्थिक व्यवहार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या माध्यमातून करत असल्याचा स्पष्ट नोंदी सापडतात. सन १९६८-६९ पर्यंत या बॅकेच्या पन्नासहून अधिक शाखा होत्या तर हीच संख्या सन १९७१-७२ पर्यंत ६८ झाल्याची नोंद मिळते. तर सध्या या बॅकेच्या जवळजवळ चारशे शाखा अस्तित्वात आहेत. यावरून गेल्या पन्नास वर्षात या संस्थेने सहकाराच्या माध्यमातून केलेल्या कार्याची कल्पना कोणासही येवू शकते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने औद्योगिक क्षेत्राला सुध्दा परके मानले नाही असे आपल्याला बॅकेचे पुर्वीचे अहवाल चाळताना सहजपणे जाणवते. याचाच अर्थ सहकाराच्या माध्यमातून या जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला निश्चितच मदत झाल्याचे हा इतिहास सांगतो. बॅकेच्या प्रोत्साहनातून जिल्ह्यामध्ये खास औद्योगिक संस्थांच्या सुध्दा स्थापना झाल्याच्या नोंदी आहेत.

**अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक:**

या बॅकेची स्थापना सन १९१० साली झाली होती. त्यानंतर या बॅकेने संपूर्ण जिल्ह्यामध्ये आपले कार्य सुरू करून व्यवहार वाढविल्याचे बॅकेच्या इतिहासात सापडते. नंतरच्या काळात या बॅकेने आपले कार्यक्षेत्र जिल्ह्याच्या बाहेर विस्तारून बीड आणि औरंगाबाद जिल्ह्यात सुध्दा शाख सुरू केल्या. यावरून असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने आपले कार्यक्षेत्र फक्त जिल्ह्यापुरते मर्यादित न ठेवता त्याचा लाभ इतर जिल्ह्यांना दिल्याचा इतिहास आहे. सन १९६६-६७ आणि सन १९६७-६८ च्या दरम्यान बॅकेचे सभासद बारा हजारपेक्षा जास्त होते. विशेष म्हणजे याच काळात बॅकेने विविध विकास कार्यासाठी २१५६०००० रुपयांची कर्जे दिल्याचा आकडा सापडतो आणि याच वर्षी बॅकेचा नफा ९६८८७ रुपये एवढा होता.

**भुविकास बॅक:**

जिल्हा जमीन तारण बॅकेची स्थापना अहमदनगर येथे सन १९६० मध्ये करण्यात आली. या बॅकेच्या स्थापनेचा हेतू शेतीसाठी दिर्घकालीन कर्ज पुरवठा असा होता. या बॅकेचे नाव बदलून ते जिल्हा भुविकास बॅक असे ठेवण्यात आले. सन १९७१-७२ पर्यंत या बॅकेच्या एकूण चौदा शाखा होत्या. या सर्व शाखांमधून शेतकऱ्यांना नविन विहीरी खोदणे, जुन्या विहीरींची दुरूस्ती, डिझेल इंजिन आणि वीजेवर चालणारे पंपसेट खरेदी करणे इत्यादी कामांसाठी सुरूवातीच्या काळात भरपूर प्रमाणाात दिर्घ मुदतीची कर्जे दिल्याचा निर्विवाद इतिहास आहे.
सन १९७० च्या सुरूवातीपासून अहमदनगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाचे विद्युतीकरण सुरू झाले. त्यामुळे विहीरीतून पाणी उपसण्यासाठी वापरात असणारी बैलमोट कालबाह्य झाली. कारण जिल्हा मध्यवर्ती बॅक आणि जिल्हा भुविकास बॅक या दोन सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांना खुप

मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करून वीज पंप खरेदी करण्यास प्रोत्साहीत केले. साधारणपणे जिल्ह्याच्या दुष्काळी भागातील कृषी विकासाची सुरूवात असे या कालखंडाला संबोधले जाते. या कामी सुद्धा सहकारी चळवळीने अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडल्याचा इतिहास प्रत्येक विहीर बागायतदार सांगतो.

सन १९६७-६८ / सन १९६९-७० आणि सन १९७०-७१ या काळात जिल्हा भुविकास बॅंकेची प्रगती अत्यंत उल्लेखनिय स्वरुपाची होती. कारण या काळात बॅंकेची सभासद संख्या जवळजवळ दिडपट वाढली. तर भाग भांडवल दुप्पट झाले. तसेच राखीव निधी सहापटीपेक्षा जास्त झाला. अशा प्रकारे जिल्हा भुविकास सहकारी बॅंकेच्या लक्षणिय कामाचा ऐतिहासिक मागोवा, उपलब्ध कागदपत्रे, अहवालावरून तसेच जाणकारांच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्राथमिक सहकारी कृषी वित्त संस्था:**

या संस्थांचा उल्लेख सुरूवातीपासून सहकारी सोसायटी असाच केला जातो. सन १९६७-६८ साली जिल्ह्यातील एकूण प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या १०८१ एवढी होती तर सन १९७१-७२ पर्यंत ही संख्या १०९० पर्यंत वाढल्याची नोंद सापडते. या संस्थांमार्फत अल्प, मध्यम आणि दिर्घ मुदतीच्या कर्जाचे वितरण झाल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना विकास कामासाठी आवश्यक असणारी साधने खरेदी करणे असाच या कर्जाचा उद्देश होता. सुरूवातीपासून या संस्था भांडवलासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेवर अवलंबून होत्या.

**सहकारी खरेदी विक्री संघ:**

सन १९६८-६९ साली अहमदनगर जिल्ह्यात एकूण चौदा सहकारी खरेदी विक्री संघ अस्तित्वात होते. या सहकारी खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून जिल्ह्यात कृषी उत्पादन आणि साधनांच्या बाजारपेठेचे जाळे निर्माण झाले. या सहकारी संघाच्या माध्यमातून खते, औषधे, बियाणे, डिझेल इंजिन, सिमेंट, फवारा पंप इत्यादींच्या विक्री होत असत. एवढेच नव्हे तर कमीत कमी नफा या तत्वावर औषधे, कापड, जीवनावश्यक वस्तू ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्याचे काम केले. त्याचप्रमाणे सन १९६८-६९ साली जिल्ह्यात एकूण सहा कृषी उत्पादन संघ अस्तित्वात होते. या संघांनी शेतमाल व आदान विक्री व्यवस्थेतून दलाल आणि मध्यस्थांचे उच्चाटन करू पारदर्शक विक्री व्यवस्था निर्मितीचा इतिहास घडविला. या सहकारी खरेदी विक्री संघामार्फत महाराष्ट्र सरकारच्या वतीने धान्य खरेदी करण्याचे काम सुध्दा सुरूवातीपासून केल्याचे दिसून येते. सन १९६६-६७ ते सन १९६७-६८दरम्यान संघाची सदस्य संख्या १३२९० वरून १५२६२ पर्यंत वाढली. त्याचप्रमाणे सन १९६८-६९ साली १६२१ सहकारी संस्था सुध्दा या संघाच्या सभासद होत्या. तसेच भाग भांडवल, सरकारी भांडवल, खेळते भांडवल इत्यादी बाबतील सुध्दा या संघांनी अहमदनगर जिल्ह्यात नेत्रदिपक यश मिळविले होते.

**कृषी प्रक्रिया सहकारी संस्था:**

कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांनी जिल्ह्याच्या कृषी आणि आर्थिक विकासाला स्थापनेपासून महत्वाचे वळण दिले. एवढेच नव्हे तर या संस्थांच्या स्थापनेमुळे जिल्ह्याच्या पिक रचने सुध्दा बदल घडून आले. अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तर भागाने या संदर्भात अत्यंत महत्वाची व ऐतिहसिक कामगिरी केल्याचे दिसून येते. सन १९७१-७२ साली जिल्ह्यात अशा प्रकारच्या दहा

सहकारी प्रक्रिया संस्था अस्तित्वात होत्या. या संस्थांची एकूण सदस्य संख्या ९९५० एवढी होती. या संस्थांची आर्थिक परिस्थिती सुध्दा चांगली होती. प्रक्रिया संस्थांनी प्रामुख्याने टोमॅटो प्रक्रिया, गुळ आणि खांडसरी उत्पादन, तेल गिरणी, भात गिरणी, सुत गिरणी इत्यादी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम केले. सुरूवातीच्या काळात या संस्थांची उभारणी जिल्ह्यातीत राजूर, श्रीरामपूर, अहमदनगर, शेवगाव तसेच संगमनेर इत्यादी ठिकाणी झाली होती. संगमनेर येथील तेलगिरणी ही महाराष्ट्र राज्यातील सहकारी तत्वावर उभारलेली पहिली तेलगिरणी होती. अशा प्रकारे अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीने अनेक बाबतील योजना व कार्य प्रथम सुरू करण्याचा इतिहास घडविला असल्याचे दिसून येते.

**सहकारी साखर कारखानदारी:**

अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी साखर कारखानदारीचा इतिहास अभ्यासल्या शिवाय अशिया खंडाच्या सहकारी साखर कारखानदारीचा इतिहास सुध्दा अपूर्ण राहतो. याला या जिल्ह्याच्या सहकाराचा उल्लेखनिय इतिहास साक्षी आहे. सन१९४९ साली अहमदनगर जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना प्रवरानगर येथे सुरू झाला. त्यांनतर कोपरगाव, संगमनेर, श्रीरामपूर, राहूरी, नेवासा आणि जिल्ह्याचा उर्वरित भगत अनेक सहकारी साखर कारखान्याची मालिका सुरू झाली. या सर्व कारखान्यांच्या उभारणीमुळे जिल्ह्यातील शेतकरी, सावकार, जमीनदार, मारवाडी, व्यापारी, दलाल यांच्या कर्जाच्या विळख्यातून मुक्त होण्यास मदत झाली. सन १९६७-६८ साली सहकारी साखर कारखान्यांची एकूण सदस्य संख्या पंचवीस हजारापेक्षा जास्त होती. या जिल्ह्यात एकूण तेरा सहकारी साखर कारखाने कार्यरत होते.

सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक परिवर्तनाचा इतिहास घडून आला. कारण ज्याप्रमाणे कारखानदारीच्या माध्यमातून जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळाली त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या शिक्षण व तंत्रशिक्षण संस्था सुध्दा उदयास आल्या. ज्या काळात फक्त महाराष्ट्रच नव्हे तर भारताच्या इतर राज्यात सुध्दा आरोग्य विषयक उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या त्या काळात अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने ही उणीव भरून काढल्याचे दिसून येते. नंतरच्या काळात महाराष्ट्रात अनेक नविन सहकारी साखर कारखाने उभे राहिले आणि त्यांच्या मार्फत शिक्षणसंस्था सुध्दा उदयास आल्या. परंतु अहमदनगर जिल्ह्याच्या मानाने त्यांची प्रगती जास्त असल्याचा इतिहास सापडत नाही.

**उपभोगत्यांच्या सहकारी संस्था:**

उपभोग सहकारी संस्थांनी स्थापनेपासून त्यांच्या सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केल्याचे दिसून येते. इतर प्रांताच्या तुलनेत ऐतिहासिक दृष्ट्या नगर जिल्हा या बाबतीत सुध्द अग्रेसर राहिला आहे. सन१९६६-६७ साली अहमदनगर जिल्ह्यात अशा प्रकारच्या एकूण एकोणतीस सहकारी संस्था अस्तित्वात होत्या त्याच वेळी या संस्थांची सभासद संख्या चौदा हजारपेक्षा जास्त होती तर भाग भांडवल सात लाखांपेक्षा जास्त असून, चालू भांडवल एकोणीस लाखांपेक्षा जास्त असल्याची नोंद सापडते.

**सहकारी गृहनिर्माण संस्था:**

अलिकडच्या काळात प्रत्येक ठिकाणी इतक्या सहाकरी गृहनिर्माण संस्था निर्माण झाल्या आहेत की, त्यामुळे ही अगदी वर्तमानातील घटना वाटावी. परंतु अहमदनगर जिल्ह्याच्या बाबतील या क्षेत्रात सुध्दा ऐतिहासिकपणाच सापडतो. अहमदनगर जिल्ह्यातील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या संदर्भात सर्वसमावेशकता असल्याचा इतिहास सापडतो. कारण पुरग्रस्त मागासवर्गीय आणि इतर लोकांच्या अशा वेगवेगळया सहकारी गृहनिर्माण संस्था असल्याचा इतिहास अहमदनगर

जिल्ह्याच्या बाबतीत सापडतो. सन १९७० साली अशा प्रकारच्या १३२ सहकारी गृहनिर्माण संस्था अहमदनगर जिल्ह्यात होत्या. मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना खास सवलतीच्या दरात कर्ज पुरवठा उपलब्ध झाला होता. यावरून असे दिसून येते की, अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीमध्ये पूर्वीपासून सर्वसमावेशकता आलेली आहे.

**सहकारी औद्योगिक संस्था:**

अहमदनगर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा पाया जरी सहकारी साखर कारखानदारीने घातला असला तरी, तो फक्त तेवढ्यापुरता मर्यादित नाही. असे या जिल्ह्याचा औद्योगिक इतिहास पाहताना दिसून येते. सन १९७० साली अहमदनगर जिल्ह्यात एकूण १०१ सहकारी औद्योगिक संस्था अस्तित्वात होत्या. या सहकारी संस्थांमध्ये प्रामुख्याने आपल्याला हातमाग, चर्मउद्योग, तेल गिरण्या, सुत गिरण्या इत्यादींचा समावेश असल्याचे इतिहासात दिसून येते. या सर्व संस्थांना कर्ज पुरवठा करण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक आणि महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांनी केल्याच्या नोंदी सापडतात.

**सहकारी दुध उत्पादन संस्था:**

भारताच्या धवलक्रांतीमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे ऐतिहासिक स्थान नाकारता येणार नाही. सहकारी दुध संस्थांच्या संदर्भात अहमदनगर जिल्ह्याचा इतिहास पाहताना आपल्याला सन १९६० च्या दशकातील घडामोडीकडे लक्ष द्यावे लागेल. सन १९६६-६७ साली अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी दुध संस्थांमार्फत दररोज एकूण सात हजार लिटर एवढे दुध संकलन होत असे. सन १९६६-६७ साली हे दुध संकलन करणाऱ्या एकूण तेवीस सहकारी संस्था अहमदनगर जिल्ह्यात कार्यरत होत्या. या सर्व संस्थांचे भाग भांडवल तसेच संकलित होणाऱ्या दुधाची किंमत त्या काळात सुध्दा कित्येक लाखांच्या आसपास होती. नंतरच्या काळात ही चळवळ वाढत जाऊन त्याचे स्वरुप इतके मोठे झाले की, कोणत्याही खाजगी औद्योगिक गृहाला मागे टाकू शकेल.

**प्राथमिक माहितीच्या आधारे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा ऐतिहासिक मागोवा:**

**पार्श्वभूमी:**

अहमदनगर जिल्हाही सहकारी चळवळीची जननी मानली जाते. सन १९०५ च्या सुमारास देशात सहकार चळवळ सुरू झाली. परंतु या चळवळीने जोम स्वातंत्र्यानंतरच धरला होता. अहमदनगर जिल्ह्याच्या बाबतीत मात्र असे घडले नाही. कारण येथील लोकांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून जिल्ह्यातील समाजाचे सर्वतोपरी कल्याण साधण्याचा प्रयत्न केला. ही सहकारी चळवळ नंतरच्या काळात सुध्दा वाढतच गेली. महाराष्ट्र राज्यात अहमदनगर जिल्हा पूर्वीपासूनच पुरोगामी समजला जातो. वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी सन १९४९ साली अहमदनगर जिल्ह्यात प्रवरेच्या काठी पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. केवळ महाराष्ट्रात नव्हे तर अशिया खंडातील सहकारी तत्वावर सुरू होणारा हा पहिला सहकारी साखर कारखाना होता. या साखर कारखान्याच्या माध्यमातून सहकारी चळवळीने जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाला एक नवी दिशा दाखविली. सहकाराच्या माध्यमातून एकमेकांशी सलग्न असे उद्योग उभे करायचे. 'ना नफा ना तोटा' तत्वावर ते चालवायचे आणि त्यातून परिसरातून चोहोबाजूंनी विकास साधायचा अशी ही विकासाची दिशा होती. त्या दिशेने सहकार वाढवत नेला तर परिसराच्य विकासाबरोबरच सर्वसामान्य ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत होते. हे ओळखुनच जिल्ह्यातील पद्मश्री विखे पाटील, गणपत आण्ण औताडे, काशिनाथ पाटील, बापूसाहेब जगताप,

विलासराव काळे इत्यादी पहिल्या फळीतील कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या सहकारी चळवळीला वाहून घेतले. या सर्वांना दिशा दाखवून मदत करण्याचे कार्य वैकुठभाई मेहता आणि धनंजयराव गाडगीळ यांनी केले. अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीतील दुसऱ्या फळीतील कार्यकर्ते म्हणून माजी केंद्रीय मंत्री आण्णासाहेब शिंदे, माजी मंत्री खताळ पाटील, शंकरराव पाटील, बाळासाहेब भगत, बाळासाहेब विखे, शिवाजीराव नागवडे इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. या सर्व उद्यमशील आणि सुशिक्षित कार्यकर्त्यांनी आपल्या गावचा, तालुक्याचा आणि जिल्ह्याचा विकास करायचा म्हणून विविध पातळ्यांवर काम केले. त्यातीलच एक महत्वाचे काम म्हणजे परिसरातील शेतकरी, शेतमजुर तसेच कष्टकरी जनतेसमोरील आर्थिक अडचणी दूर करण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या विविध सहकारी पतसंस्था, सोसायट्या आणि बँका होत.

**सहकारी चळवळीच्या उदयास कारणीभूत जिल्ह्याची ऐतिहासिक परिस्थिती:**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या उदयास पारतंत्र्याचा अस्त होऊन स्वातंत्र्य मिळेपर्यंत वाट पहावी लागली नाही. साधारणपणे सन १९३० ते सन १९३२ च्या दरम्यान अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने जोम धरला होता. हा काळ साधारणपने इतिहासात जागतिक महामंदीचा काळ म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्ह्याच्या बाबतीत सहकाराच्या माध्यमातून परिवर्तनाची सुरूवात झाली. याच काळात गोदावरी आणि प्रवरा नदीच्या कालव्यांची निर्मिती झाली. पाणी पुरवठ्याची सुविध उपलब्ध झाल्यामुळे ऊस लागवडीचे प्रमाण वाढले. जिल्ह्यात रोजगारांच्या संधी वाढल्या. शेतकरी वर्गाला आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता निर्माण झाली. वास्तवात मात्र परिस्थिती तशी नव्हती. दरम्यानच्या काळात बेलापूर, सावळेविहीर आणि इतर काही ठिकाणी साखर कारखाने सुरू झाले होते. बहूतेक शेतकऱ्यांचा ऊस लागवडीखालील जमीनी या खाजगी साखर कारखानदारीकडे खंडाने किंवा भाडे पट्ट्याने दिल्या गेल्या होत्या. खंडाचे दर बहूतेक शेतकऱ्यांना फारसे लाभदायक नव्हतेच. उर्वरित शेतकऱ्यांच्या जमीनी पुणे जिल्ह्यातील बारामती व सासवड भागातून आलेल्या लोकांकडे खंडाने गुंतल्या गेल्या. यामुळे जिल्ह्यात खंडकरी जमीनदारांचा एक नविनच वर्ग उदयास आला होता. याचाच अर्थ जिल्ह्याच्या स्थानिक शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बेतातचीच होती. अशा स्थितीत छोट्या छोट्या शेतकऱ्यांना आर्थिक गरजा पूर्ण करणे कठीण जात होते.

**सावकारी पाशात अडकलेली जिल्ह्याची ग्रामीण जनता:**

जिल्ह्यात सहकारी चळवळीच्या माध्यमातून परिवर्तनाला सुरूवात होण्या अगोदर ग्रामीण भागात सावकारी धंद्याने चांगला जोर पकडला होता. छोटे शेतकरी, कामगार, कष्टकरी असे बहूतेक लोक आपल्या छोट्या छोट्या गरजा पूर्ण करण्यासाठी सावकारांकडून कर्जे घेत. सावकारी व्यवसाय करण्यामध्ये प्रामुख्याने उच्चवर्णीयांचा समावेश होता. यामध्ये मारवाडी तसेच इतर व्यावसायिकांचा भरणा होता. ही मंडळी दिलेल्या कर्जाच्या बदल्यात व्याजापोटी दामदुप्पट पैसा वसूल करत. परंतु अनेकांकडे सावकाराला देण्यासाठी पैसे नसत. तेव्हा धान्य किंवा वस्तूच्या स्वरुपात कर्जाची परतफेड केली जायची. त्यातही अनेक लोकांची लुबाडणूक होत असे. काही शेतकऱ्यांच्या तर जमीनी ताब्यात घेवून त्या जमीनी खंडाने पुन्हा त्याच शेतकऱ्याला देऊन सावकारांनी मोठी पिळवणूक चालविली होती. अहमदनगर जिल्ह्यात सर्वत्र पिळवणूकीचे चित्र होते. बँका होत्या, परंतु खेड्यापर्यंत फारशा पोहोचल्या नव्हत्या. शिवाय आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गाला कर्ज पुरवठा करायचा म्हणजे बँकांना वसूलीच्या दृष्टीने सोयीचे वाटत नसे. शिवाय बॅंकेच्या अनेक अटी असायच्या. तारणांसाठी लोकांकडे साधने नसत. शेवटी अखेरचा पर्याय म्हणून लोक सावकारांकडून कर्ज घ्यायचे. कर्जात अडकलेला शेतकरी समोर आला की, सावकार मंडळी वाटेल तसे नियम लावून त्याला लुटायचे, या

सावकार मंडळींना शेतकऱ्यांच्या हिताचे काही देणे घेणे नसे. त्यांचा व्याजाबाबत कोणताही असा नियम नव्हता. त्याकाळी व्याजाने पैसा पुरविणारे पठाण सावकार सुध्दा अस्तित्वात होते. दरमहा रुपयाला चार आणे किंवा वर्षाकाठी शंभर रुपयांना तीनशे रुपये व्याज आकारत असत. वेळेवर वसूली न झाल्यास बळाचा वापर सुध्दा होत असे. पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने दैनंदिन गरजांसही शेतीचे भांडवल तसेच, लग्नकार्य पार पाडण्यासाठी खेड्यातल्या लोकांना पैशाची गरज भासायची. अशा वेळी जमीनी तारण ठेवून सावकार पैसे द्यायला तयार असे. सहज पैसे उपलब्ध होतात म्हंटल्यावर सावकाराकडून पैसे घेण्यावर लोकांचा कल असायचा. नंतरच्या काळात सावकारी व्यवसायात जमीनदार शेतकरी सुध्दा उतरले. त्यामुळे स्थानिक लोकांना नवा व नविन पर्याय उपलब्ध झाला. परंतु लोकांच्या गरजा पूर्ण होण्याऐवजी ते अधिकच अडचणीत सापडू लागले. कारण कर्जावर आकारले जाणारे व्याज भरमसाठ असायचे. काही सावकार छोट्या शेतकऱ्यांना बियाणे व खताचा पुरवठा करायचे. परंतु त्याची फेड दुप्पट तिप्पट प्रमाणात करावी लागे. त्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांचे काबाडकष्ट फुकट जात असे.

अहमदनगर तसा दुष्काळी भागात मोडणारा जिल्हा होता. त्यामुळे अनेकांची आर्थिक स्थिती हलाखीचीच होती. परिणामी परिस्थिती आणखीणच वाईट झाली. या साऱ्यांचा फायदा सावकार वर्गाने उठविला नसता तर नवलच. शंकरराव काळेंसारख्या अनुभवी धुरीनाणी नमूद केले की, पुरेसे उत्पन्न मिळवून देणारे एकही चांगले साधन उपलब्ध नसल्याने सावकारांचा आधार घ्यावा लागत असे. पण सावकारांनी त्याचा फायदा उठवत अनेकांची लुट केली व देशोधडीला लावले. कर्जाचा डोंगर वाढत गेल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले. ''व्याजाचे दर तर महिन्यासाठी शंभर रुपयांसाठी दहा ते वीस रुपयापर्यंत जावून पोहोचले होते. कोरडवाहू शेती, दुष्काळी जिल्हा आणि सावकारांचा आवळत चाललेला पाश यामुळे शेतकरी वर्ग पिचला होता. या सर्व परिस्थितीला तोंड देवून बदल करण्यासाठी नंतरच्या काळात सहकारी चळवळीने जिल्ह्यात फार मोठे योगदान दिल्याचा इतिहास आहे.

**जिल्ह्याच्या विविध भागात सावाकरांच्या विरोधात झालेले उठाव:**

मुठभर सावकार मंडळींनी चालविलेल्या अविरत लुटींमुळे त्या काळात सुशिक्षित तरुण वर्ग संतापला होता. जोडीला अहमदनगर जिल्ह्यातील समाजवादाचे वातावरण होतेच. त्यामुळे सन १९३० नंतरच्या काळात अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, अकोला, कोपरगाव, संगमनेर, श्रीरामपूर इत्यादी तालुक्यात सावकारांच्या विरोधात प्रखर आंदोलने झाली. यामध्ये प्रामुख्याने त्या काळच्या तरुणांची नावे घ्यावी लागतील. आणि ती म्हणजे पारनेरचे नामदेव औटी, कोपरगावचे रोहमारे, संगमनेरचे भाऊसाहेब थोरात इत्यादी होत. या सर्व मंडळींनी सावकारंवर एक जबरदस्त धाक बसविला. कर्जाची कागदपत्रे व दस्तऐवज जाळले. या आंदोलनाची आवश्यकता आणि तीव्रता कमी झाल्यानंतर तरुणांना विधायक कामाची ओढ लागली. त्यातूनच पुढे अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली.

**सहकाराच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्याच्या परिवर्तनाची मुहूर्तमेढ:**

सवकारी पाशात अडकलेल्या गरीब खेडूतांचे जीवन तळमळीच्या कार्यकर्त्यांना बघविणे शक्य नव्हते. त्यात इंग्रज राजवटी विरूध्द पसरलेला रोष, स्वातंत्र्यासाठी सुरू असलेली आंदोलने व ध्येयाने प्रेरित होऊन आंदोलनात उडी घेण्याच तो काळा होता. त्यातच सावकारीच्या जोखडातून ग्रामीण जीवनाला मुक्त करणारी विकासाची नवी वाट शोधणे हे आव्हन होते. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात सन१९३०-३२ सालच्या दरम्यान अहमदनगर जिल्ह्यात काही प्राथमिक पत संस्थांच्या स्थापना झाल्या. परंतु फारशी प्रगती होवू शकली नाही. मात्र स्वातंत्र्यानंतर अशा

प्रयत्नांना अधिकच जोम आला आणि जिल्ह्याच्या सर्व भागात वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्था उदयास येवून फोफावू लागल्या.

दुष्काळ हा अहमदनगर जिल्ह्याच्या पाचविला पुजलेला कायमचा गहन प्रश्न असल्याने शेती आणि त्यावर आधारित असलेले सहकारी तत्वावरील उद्योग स्थापन करण्याची निकट अधिक भासली. सहकारी तत्वावर स्थापन झालेले उद्योग नंतरच्या काळात भरभराटीस आले. त्यामुळे परिसराचे आर्थिक चित्र पालटले. स्वावलंबनाची आस आणि तरुण सुशिक्षितांची सेवाभावी वृत्ती या दोन बाबींमुळे सहकारी चळवळीला गती मिळाली. दरम्यानच्या काळात प्रवरा आणि गोदावरी नद्यांचे कालवे येवून थडकले होतेच. शेतात कालव्याचे पाणी खेळू लागल्याने परिसरात बदल येवू घातला होता. दरम्यानच्या काळात महाराष्ट्राच्या इतर भागात विविध पातळयांवर सहकाराने चांगलाच जोर धरला होता. छोट्या छोट्या सेवा संस्थांच्या माध्यमातून सहकारी तत्वावर अनेका कामे सुरू करण्यात आली होती. ग्रामीण भागात खास शेती, शेतकरी, शेतमजूर आणि एकूण ग्रामीण कष्टकरी जनतेच्या उन्नतीचे उद्दिष्ट ठरवून अनेक सहकारी संस्था व सोसायट्यांनी गावोगावी स्थापना होत होती. त्यात प्रामुख्याने सहकारी सोसायट्या, पतसंस्था, दुध संस्था, ग्राहक भांडारे, आदिवासी गृहनिर्माण संस्था, सहकारी पाणी पुरवठा संस्था, खरेदी विक्री संघ अशा स्वरुपाच्या संस्थांचा समावेश होता. या संस्थांनी एकूणच अहमदनगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात विकासाची एक वेगळी पध्दत निर्माण केली होती, ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नविन रुप देवून या संस्था, शेतकरी व शेतमजूरांच्या जीवनाचा एक आधारस्तंभ बनत होत्या. त्यामुळे ही बाब अहमदनगर जिल्ह्यातील सामाजिक भान लक्षात ठेवून लोकांसाठी काम करण्याची उमेद बाळगणाऱ्या तरुणांच्या लक्षात न येतील तर नवलच होते. मध्यंतरीच्या काळात गोदावरी आणि प्रवरा कालव्यामुळे परिसरातील ऊसाचे उत्पादन वाढले होते. या ऊसापासून साखर तयार करण्यासाठी बेलापूर, सावळेविहीर या ठिकाणी खाजगी साखर कारखाने उभे राहिले होते. परिणामी जिल्ह्यातील सहकार धुरिणांना साखर कारखानदारीचे स्वप्न पडू लागले. आणि त्यातूनच पुढे अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारीला सुरूवात झाली.

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखनदारीचा इतिहास:**

सन १९४९ साली पुणे येथील गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक धनंजयराव गाडगीळ यांनी श्रीरामपूर जवळील प्रवराकाठच्या लोणी येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या मदतीने प्रवरा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली. त्यानंतर एकापाठोपाठ एक असे अनेक सहकारी साखर कारखाने अहमदनगर जिल्ह्यात उभे राहिले. परिणामी सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्याच्या औद्योगिकरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. सहकारी साखर चळवळीने फक्त साखर उत्पादनावरच लक्ष केंद्रीत केले असे नाही तर, कारखान्याच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी इतर अनेक कामे हाती घेतली. हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. शेतकऱ्यांच्या मालाला वाजवी भाव मिळू लागला. कर्ज बाजारीपणातून सुटका होण्यास मदत झाली. आर्थिक परिस्थिती सुधारल्याने शेतकऱ्यांचे जीवनमान बदलले. शेतीचे यांत्रिकीकरण सुरू झाले. शिक्षणाच्या सोयी वाढल्या. हा सर्व बदल सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून आलेला होता.

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी कर्जपुरवठा चळवळीचा इतिहास:**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी पत पुरवठा चळवळ, साखर कारखानदारीपेक्षा जुनी आहे. स्वातंत्र्यापुर्वीच्या काळात अहमदनगर जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी प्राथमिक सहकारी सोसायट्यांची स्थापना झाली होती. सन १९३०-३२ च्या दरम्यान अहमदनगर जिल्ह्यात अनेक सहकारी पत पुरवठा संस्थांची स्थापना झाली. गावोगावी विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या

अस्तित्वात होत्याच. या संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेकडून भांडवल घेवून आपल्या सभासदांना कर्जपुरवठा करत असत. परंतु कर्जपुरवठा करणे एवढेच काम या संस्थांनी केले नाही तर, शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या औजारांची उपलब्धता सुध्दा या संस्थांनी करून दिली.

ज्याचे हातवरचे पोट आहे किंवा शेती आहे पण पुरेसे उत्पादन निघत नाही अशा सर्व सामान्य जनतेस स्वस्तात अन्नधान्य मिळाले तर अनेक कुटुंबासामोरील महत्वाचा प्रश्न सुटू शकेल. या विचारांनी गावोगावच्या सहकारी संस्थांनी 'ना-नफा-ना-तोटा' या तत्वावर स्वस्त धान्य दुकाने सुरू केली. त्याचप्रमाणे सोसायटीच्या सभासदांना पाण्यासाठी आवश्यक असणारे डिझेल इंजिन आणि ट्रॅक्टर साठी लागणारे इंधन जवळ मिळावे म्हणून यापैकी अनेक संस्थांनी स्वत:चे पेट्रोल पंप सुरू केले. मुळात या सहकारी संस्था बहुउद्देशिय संस्था होत्या. त्यामुळे अन्नधान्याची सुरक्षित साठवणूक व्यवस्था निर्माण करण्याच्या कामी सुध्दा या संस्थांनी मोलाची भर घातली. परिणामी वाया जाणारे अन्नधान्य वाचले. त्याचप्रमाणे गोदामातील धान्याच्या तारणावर कर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. परिणामी ताबडतोब मिळेल त्या किंमतीला होणारी शेतमालाची विक्री थांबली. परिणामी मालाला चांगला भाव येईपर्यंत शेतकऱ्यांना थांबणे शक्य होवू लागले. जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या अशा प्रकारच्या बहूउद्देशिय कार्यप्रणालीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. त्याचप्रमाणे सावकारी पाशातून त्यांची सुटका होण्यास मोलाची मदत झाली.

**सहकारी चळवळीत काम करणाऱ्यांची त्यागी वृत्ती:**

गोखले अर्थशास्त्र संस्थेचे धनंजयराव गाडगीळ किंवा पदृमश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्य विषयी बोलताना चळवळीतील वयस्कर कार्यकर्त्यांचे डोळे पाणवतात. दोघांचेही राहणीमान अत्यंत साधे, काम करण्याचा आवाका आणि लोकसंपर्क दांडगा अशी परिस्थिती. धनंजयराव गाडगीळ चटईच्या छाताखाली बसून काम करत असत. तर पद्मश्री विखे पाटलांची त्यागी वृत्ती आणखी वेगळीच होती. पद्मश्री विखे पाटलांनी विमा प्रतिनिधीचे काम करताना स्वत:ला मिळणारे कमिशन सहकारी चळवळीसाठी वापरले. कारखान्याबरोबर त्यांनी मुलींच्या शिक्षणाकरिता एक संस्था स्थापन केली. संस्थेच्या निधीसाठी आवश्यक पैसा उभा करताना त्यांनी स्वत:च्या विमा कमिशनचा पैसा सुध्दा वापरला. शेतकऱ्यांना रास्त भावात शेतीची औजारे उपलब्ध व्हावीत म्हणून सहकारी तत्वावर एक कारखाना उभा केला. परंतु यामध्ये मात्र ते यशस्वी होवू शकले नाहीत. कारण नंतरच्या काळात तो कारखाना बंद पडला. परंतु अपयशाने खचून न जाता ते तेथेच थांबले नाहीत तर सहकारी साखर कारखानदारी बरोबरच त्यांनी शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर अनेक क्षेत्रात सहकाराच्या माध्यमातून कार्य केले. सहकारी चळवळीत काम करणाऱ्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची वृत्ती त्यागाची होती. व्यक्तीगत नफा किंवा स्वार्थाची भावना अजिबात नव्हती. याचे उदाहरण देताना उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे विठ्ठलराव विखे पाटील यांनी स्वत:च्या पत्नीचे दागिने मोडून सुरूवातीच्या काळात पैसा उभा करण्याच्या कामी मागे पुढे पाहिले नाही.

**सहकार चळवळीच्या माध्यमातून जिल्ह्यातील शिक्षण प्रसार:**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. ग्रामीण विकासाचे सर्वांगिण उद्दिष्ट गाठावयाचे असेल तर, शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. परिणामी शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात पोहोचली नाही तर, विकास साधण्यात मोठी अडचण येईल. हे त्या काळच्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी ओळखले होते. अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षण प्रसाराचे पहिले श्रेय

कर्मवीर भाऊराव पाटलांना द्यावे लागेल तसेच आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाचे श्रेय पद्मश्री विठ्ठलराव पाटील यांच्याकडे जाते. त्यानंतरच्या काळात जिल्ह्यातील शिक्षण प्रसाराच्या कामी सहकरी चळवळीने फार मोठे योगदान दिले. जिल्ह्यातील तळमळीच्या सहकारी कार्यकर्त्यांनी शिक्षणाचे महत्व ओळखल्याने, सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात अनेक शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेला फार मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. परिणामी अहमदनगरची सहकारी चळवळ आणि रयत शिक्षण संस्थेचे अत्यंत जीवापाड आणि घनिष्ट स्वरुपाचे नाते निर्माण झाले. शंकरराव काळे सारख्या उच्चशिक्षित तरुणाने चांगल्या सरकारी नोकरीचा राजीनामा देवून सन १९५० च्या दशकात सहकारी चळवळीत येवून काम सुरू केले. प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या पहिल्या संचालक मंडळावर त्यांनी पद्मश्री विखे पाटील आणि धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वात काम केले. नंतरच्या काळात कोपरगाव सहकारीचे चेअरमन, आमदार, खासदार, मंत्री असा राजकीय प्रवास झाला. त्यांनी स्वत:च्या शैक्षणिक संस्था कमी प्रमाणात उभ्या केल्या. परंतु सहकाराच्या सहाय्याने रयत शिक्षण संस्थेला भरघोस मदत केली. ग्रामीण भागात ठिकठिकाणी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये चालविण्यास मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य केले. परिणामी अहमदनगर जिल्हा रयत शिक्षण संस्थेच्या जास्तीत जास्त शाख असणारा जिल्हा होऊ शकला. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वत:च्या शिक्षण संस्था काढल्या असत्या तर मोठे शिक्षण सम्राट झाले असते. परंतु सुरूवातीच्या काळात निरपेक्ष वृत्तीने चळवळीच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेला मदत केली.

**सहकार चळवळ आणि इंग्रजी माध्यमाचे आधुनिक शिक्षण:**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना इंग्रजी शिक्षणाचा वारसा नव्हता. परंतु बदलत्या काळात इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता अहमदनगर जिल्ह्यातील जाणकार सहकार धुरिणांना जाणली. आणि एकामागोमाग एक अशा गुरूकुलावर आधारीत इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू करण्यात आल्या. यामध्ये उल्लेख करवा लागेल अशा शाळा म्हणजे प्रवरा सहकारी साखर कारखान्याने सुरू केलेले प्रवरा पब्लिक स्कूल, कोपरगाव सहकारी साखर कारखान्याने सुरू केलेले कोळपेवाडी गौतम पब्लिक स्कूल या होत. सहकार चळवळीच्या माध्यमातून जी आर्थिक सुबत्ता निर्माण झाली, त्यामुळेच जिल्ह्यातील शिक्षण प्रसाराला मोठी गती मिळाली. रयत शिक्षण संस्थेला मदत करताना जिल्ह्यातील सहकार चळवळीने फक्त आर्थिक मदत केली नाही तर शाळा व महाविद्यालयासाठी आवश्यक असणारी जमीन व इमारतींचे बांधकाम सुध्दा करून दिले.

**सहकारी चळवळीच्या माध्यमातून स्त्री शिक्षणाचा विस्तार:**

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात स्त्री शिक्षणाची सुरूवात झाली होतीच. परंतु जिल्ह्यातील स्त्री शिक्षणाला खरी गती प्राप्त झाली ती सहकारी चळवळीच्या मर्जीमुळे. पद्मश्री विखे पाटील यांनी परिसरातील मुलींना शिक्षणाच्या संधी निर्माण करून देण्यासाठी प्रवरा परिसरात खासा ट्रस्ट स्थापन केला. त्याच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केली. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीने वेगवेगळ्या ठिकाणी मुलींना शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या. परिणामी जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाच्या सुविधा सहकारी चळवळीने प्राप्त करून दिल्या. अहमदनगर जिल्ह्याची सहकारी चळवळ आणि शिक्षण प्रसाराचा संबंध याविषयी लिहीताना आणखी एक बाब महत्वपूर्ण ठरते. ती म्हणजे

जिल्ह्यातील सहकारी चळवळीने रयत शिक्षण संस्थेकडून चालविल्या जाणाऱ्या जिल्ह्याबाहेरील शाळांना सुध्दा मदत केल्याचा इतिहास आहे. तसेच शिक्षण प्रसार करताना सहकारी साखर चळवळीने ज्या तालुक्यात कारखाना आहे तेवढ्या तालुक्यापुरताच विचार न करता संपूर्ण जिल्हा डोळ्यासमोर ठेवून कार्य केले.

**जिल्ह्यातील सहकारी चळवळ आणि अपरंपरागत उच्च शिक्षणाचा प्रसार/सुविधा:**

जिल्ह्यातील सहकारी चळवळीमुळे होणार विकास हा कुणा एका व्यक्तिचा अथवा क्षेत्राचा किंवा गटाचा विकास नव्हता. तर त्याची व्यापकता सर्वसमावेशक होती. पुर्वीच्या काळी महाराष्ट्रात वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणाच्या फारशा सुविधा उपलब्ध नव्हत्या. हे शिक्षण देणाऱ्या सरकारी संस्थांची संख्या अत्यंत मर्यादित होती. परिणामी अहमदनगर जिल्ह्यात नव्हे तर, राज्यातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू इत्यादी राज्यांचा आधार घ्यावा लागत असे. अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महविद्यालय उभारणीचा खर्च भरमसाठ होता. अशा प्रकारचा खर्च करण्याच्या आर्थिक आणि मानसिक स्थितीत राज्य सरकान नव्हते. किंबहूना ते सरकारला शक्यही नव्हते. संस्था उभारणीचा खर्च मोठा परंतु शिक्षण क्षेत्र हे नफा कमविण्याचा व्यवसाय नसल्याने खाजगी उद्योजकांना यात रस नव्हता. परंतु या कामात अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने फार मोठे योगदान केले असे दिसून येईल. सन १९८३-८४ साली वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी खाजगी शिक्षण संस्था उभारणीचे धोरण स्वीकारले. परिणामी सहकाराच्या माध्यमातून शिक्षण संस्था सुरू होण्यास चालना मिळाली. अनेक सहकारी साखर कारखान्यांनी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून हे आव्हान स्वीकारण्याचे ठरविले. परिणामी अनेक अभियांत्रिकी व वैद्यकीय तसेच शेतकी महविद्यालये जिल्ह्याच्या परिसरात सुरू झाली. परिणामी जिल्ह्यातील शेतकरी आणि मध्यम वर्गीयांच्या मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अपरंपरागत शिक्षणाच्या सुविधा सहकारी चळवळीमुळे निर्माण झाल्या. या शिक्षण संस्थामध्ये प्रामुख्याने आयुर्वेद महाविद्यालये, दंत महाविद्याये, अॅलोपॅथिक महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, स्थापत्यशास्त्र महाविद्यालये, कृषी महाविद्यालये इत्यादींचा समावेश करावा लागेल.

**सहकारी चळवळीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सामाजिक विकासाची पायाभरणी:**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने त्यागाच्या भूमिकेतून विकासासाठी सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी मानला. या कामी सहकारी चळवळीने केलेले योगदान फार मोठे आहे. या योगदानाच्या इतिहासाचा आढावा घेताना रस्ते बांधणी, बाल आरोग्य, अग्निशामक सेवा, पिण्यासाठी पाणी पुरवठा, पर्यायी इंधन निर्मिती, कामगार कल्याण केंद्राची स्थापना, शिक्षणसाठी कर्ज पुरवठा इत्यादी घटकांवर दृष्टीक्षेप टाकावा लागेल.

**रस्ते बांधणीतून विकासाचा मार्ग:**

ग्रामीण भागाचा दळणवळणाचा महत्वपूर्ण अडथळा म्हणजे जिल्ह्यातील रस्त्यांची अडचण हा होता. या कामी सहकारी चळवळीने फार मोठे योगदाना केले. साधारणपने सन १९७५ नंतरच्या काळात सहकारी चळवळीने पक्के रस्ते बांधणीचा कार्यक्रम हाती घेतला. ज्या गावांना साधी बैलगाडी पोहोचणे अवघड होते ती गावे पक्क्या रस्त्यांच्या सहायाने हमरस्त्यांना जोडली गेली. परिणामी ग्रामीण भागातील लोकांना आसपासची शहरे आणि अहमदनगर, पुणे, औरंगाबाद, नाशिक अशा मोठ्या शहरांकडे जाणे-येणे सहज सोपे झाले. परिणामी शेतकऱ्यांच्या शेतमालाची बाजारपेठ सुध्दा विकसित झाली. रस्ते बांधणीच्या कामांसाठी साखर

कारखान्यांनी स्वत:चा वेगळा निधी उभा केला. आणि कोणत्याही सरकारी मदतीशिवाय शेकडो किलोमीटर लांबीचे कच्चे व पक्के रस्ते बांधून पूर्ण केले.

**बाल आरोग्य व कुटुंब नियोजनाच्या सुविधा:**

जिल्ह्यात सहकारी चळवळ सुरू होण्यापूर्वी ग्रामीण भागात कोणत्याही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नव्हत्या. प्रामुख्याने साखर कारखानदारी उभी राहिल्यानंतर कामगारांच्या वसाहती अस्तित्वात आल्या. या वसाहतीत आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी आरोग्य केंद्राच्या स्थापना झाल्या. या आरोग्य केंद्रावर पूर्णवेळ डॉक्टरांच्या नेमणूका करण्यात आल्या. अर्थात ही आरोग्यकेंद्रे फक्त वसाहतीतील लोकांपुरती मर्यादित नव्हती तर परिसरातील सर्व लोकांना या केंद्रामार्फत सुविध पुरविल्या जात असत. यामध्ये प्रामुख्याने लहान मुलांच्या आरोग्यासाठी खास सोयी निर्माण करण्यात आल्या तसेच कान, नाक, घसा, स्त्रीरोग, बाल रोग, हृदय रोग, नेत्र, दात इत्यादी सेवांसाठी खास विभाग सुरू करण्यात आले. या सर्व सेवा अत्यंत अल्प किंमतीत उपलब्ध करून देण्यात आल्या. यामागील तत्व 'ना-नफा-ना-तोटा असे होते.

लोकसंख्या नियंत्रणाचे देशाच्या विकासात असलेले महत्व ओळखून त्यादृष्टीने सहकारी चळवळीने काही कार्यक्रम हाती घेतले. लोकसंख्या नियंत्रणसाठी गावागावातून नसबंदीच्या शिबीरांचे आयोजन करण्यात आले. लोकसंख्या नियंत्रणासाठी नसबंदीला प्रोत्साहित करण्यासाठी रोख बक्षिसे आणि मदतीच्या योजना सहकारी चळवळीने हाती घेतल्या. त्याचप्रमाणे पोलिओ, काविळी यांसारख्या रोगांच्या प्रतिबंध योजनेस सुध्दा जिल्ह्यातील सहकारी चळवळीने आपल्या कुवतीनुसार हातभार लावला. लोकसंख्या नियंत्रणाच्या कामी सहकारी चळवळीने आधुनिक तंत्राचा देखील वापर केला. स्त्रियांवर कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्यासाठी बिनटाक्याच्या शस्त्रक्रियेचे तंत्रज्ञान वापरून त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**अग्निशमन सेवेतून तातडीची सेवा:**

ग्रामीण भागात अग्निशमन यंत्रणा लोकांच्या स्वप्नात सुध्दा येणे शक्य नव्हते. गावात कुठे आग लागली तर तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणाहून पाण्याचा बंब येईपर्यंत सगळे बेचिराख झालेले असे. काही वेळा लोकांच्या शेतातील उभे पीक सुध्दा आगीच्या भक्षस्थानी पडे. परंतु त्याला इलाज नसे. नंतरच्या काळात मात्र परिस्थिती बदलली. सहकारी साखर कारखाने आणि इतर काही सहकारी संस्थांनी स्वत:च्या अग्निशमन सेवा सुरू केल्या. अर्थात यामागे नफ्याचे नव्हे तर लोकसेवेचे उद्दिष्ट होते. या योजनेतून लोकांना ही एक नवीन सेवा उपलब्ध झाली. विजेच्या शॉर्ट सर्कीटमुळे लोकांच्या शेतातील उभा ऊस जळून जात असे, परंतु त्याला पर्याय नव्हता. नंतरच्या काळात मात्र सहकार चळवळीने या नुकसानीला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला.

**पिण्यासाठी पाणीपुरवठा:**

अहमदनगर जिल्हा पूर्वीपासून पर्जन्यछायेच्या परिसरात येतो. पावसाचे प्रमाण कमी असल्याने दरवर्षी उन्हाळ्यात अनेक गावांना पाणी टंचाई भासत असे. पैसा आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी सरकारच्या अनेक पाणी पुरवठा योजना रखडल्या होत्या. पाणी टंचाईची परिस्थिती दुष्काळाच्या काळात तर अधिकच भीषण होत असे. सरकार दरबारी काम मार्गी लावणे सोपे नव्हते. सहकारी चळवळीने मात्र यातून मार्ग काढला. सहकारी साखर कारखान्यांनी स्वत:च्या निधीतून अनेक गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टॅंकर्स उपलब्ध करून दिले. त्यासाठी गावातील लोकांकडून एक नवा पैसा सुध्दा घेतला नाही. तसेच अनेक गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना मार्गी लावण्यासाठी खास योजना सुध्दा राबविल्या.

**अपरंपरागत इंधन निर्मितीला चालना:**

ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी गॅस किंवा केरोसिनचा वापर करणे अशिक्षित जनतेच्या आकलन आणि आर्थिक कुवतीच्या बाहेरचे होते. परिणामी स्वयंपाकासाठी लाकूड फाट्याचा उपयोग करून गावाकडील महिला आपले काम चालवत असत. यामधून मार्ग काढून ग्रामीण महिलांचे जीवन सुखकर करण्याच्या कामी सहकरी चळवळीने आपले योगदान दिले. सहकार चळवळीत काम करणारे नेते राजकीय दृष्ट्या प्रबळ होवून जिल्हा परिषद आणि राज्य सरकारात डेरेदाखल झाले होते. तेथे त्यांनी हा प्रश्न उपस्थित केला. परिणामी सन १०७० च्या दरम्यान गोबर गॅस करीता राज्य शासनाने जिल्हा परिषदांमार्फत शेतकऱ्यांना प्रत्येकी तीनशे रुपये अनुदान मंजूर केले. गोबर गॅसचा उर्वरित खर्च परिसरातील सहकारी चळवळीने उचलण्याचे ठरविले. सहकारी साखर कारखान्यांनी यासाठी वेगळा निधी उभा केला. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शेतकऱ्यांनी इंधनाकरीता गोबर गॅस बांधले. ग्रामीण भागातील लोकांना प्रदुषण मुक्त इंधन मिळू लागले. विशेषत: लाकूड किंवा कोळशाच्या सहाय्याने चूली पेटवून स्वयंपाक करणाऱ्या स्त्रीयांची सुटका झाली.

**कामगार कल्याण केंद्राच्या स्थापना:**

जिल्ह्याच्या सहकार चळवळीने सामाजिक जीवन सुसंस्कृत बनविण्यसाठी खास प्रयत्न केले. सहकार चळवळीत काम करणाऱ्या कामगरांच्या हितासाठी कामगार केंद्राच्या स्थापना करण्यात आल्या. त्या केंद्रामार्फत कामगारांना अनेक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. कामगार वर्गातील वातावरण नेहमी चांगले रहावे म्हणून वेळोवेळी वेगवेगळ्या स्पर्धांची योजना सुरूवातीपासून राबविली. कामगार आणि शेतकऱ्यांच्या मुलांसाठी बालवाडी तसेच केंद्रमार्फत परिसरातील महिलांसाठी वेगवेगळ्या योजना सुरू करण्यात आल्या. कामगार वर्गाच्या महिला व बाल कल्याणासाठी खाजगी कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या संघटनांचा वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागला. परंतु जिल्ह्यातील सहकार चळवळीने या बाबतील पुढाकार घेवून मोलाचे योगदान दिले.

सहकार क्षेत्रात काम करणारे कामगार आणि शेतकरी वर्गाच्या सामुहिक विम्यांच्या योजना सुध्दा राबविण्यात आल्या. त्याच प्रमाणे एखादा कामगार आजारी पडला तर, पगारी रजा आणि कारखान्याच्या आरोग्य निधीतून आर्थिक मदतीच्या तरतूदी करण्यात आल्या.

वर्षातील फक्त काही काळ सहकारी साखर कारखान्याशी संबंधित असणारी आणि शेजारच्या जिल्ह्यातून ऊस तोडणी कामांसाठी येणारा, आर्थिक दृष्ट्या दरिद्री, ऊस तोडणी कामगार सुध्दा सहकार चळवळीने दुर्लक्षिला नाही. कोणची झोपडी जळाली, कोणाचा बैल मेला, कोणाला काम करताना इजा झाली किंवा कोणाच्या आरोग्याची तक्रार असली तरी त्यासाठी मदतीचा दृष्टीकोण ठेवण्यात आला. ऊस तोडणी कामगारांसाठी कारखान्यामार्फत सार्वजनिक विम्याच्या योजना सुरू करण्यात आल्या. थोडक्यात, एखाद्या मोठ्या उद्योग समुहातील कामगारांना जे लाभ मिळविण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागतो. ते लाभ अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने स्वत:हून देवू केले.

**सहकाराच्या माध्यमातून कर्ज पुरवठ्याचे सहकार्य:**

जिल्ह्याच्या सहकार चळवळीने शाळा, महविद्यायाची स्थापना केली. अपरंपरागत उच्च शिक्षणाच्या सुविधा सुध्दा निर्माण केल्या. ग्रामीण शेतकरी व कामगार वर्गाच्या दृष्टीने हे शिक्षण महागडेच होते. परिणामी शिक्षणाच्या सुविधा निर्माध होवून सुध्दा ग्रामीण भागातील गरीबांचा मुलगा यापासून वंचितच राहतो की काय अशी भिती निर्माण झाली.

महाराष्ट्राचा शहरी भाग आणि परप्रांतिय श्रीमंताचे लोंढे शिक्षणासाठी अहमदनगर जिल्ह्याकडे वळू लागले. लोकांच्या मनात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. यामधून मार्ग काढण्यासाठी सहकार चळवळीने पुन्हा एकदा मदत केली. ठिकठिकाणी स्थापन झालेल्या ग्रामीण भागीतील सहकारी बॅकांनी सवलतीच्या दरात शिक्षणासाठी कर्ज वाटपाच्या योजना हाती घेतल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले डॉक्टर, इंजिनियर होवू शकली. त्याचप्रमाणे तंत्रशिक्षण घेतलेल्या युवकांनी नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगारासाठी प्रयत्न करावेत, स्वत:चे उद्योगधंदे सुरू करावेत यासाठी सहकार चळवळीने या युवकांना अग्रक्रमाने कर्ज पुरवठा करण्याचे धोरण स्वीकारले.

यामुळे ग्रामीण भागातील समाज जीवन बदलले. डॉक्टर, इंजिनियर वर्गाने स्वत:चे व्यवसाय सुरू केले. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील शेतकरी व कामगार वर्गाची मुले अहमदनगर, नाशिक, पुणे यासारख्या ठिकाणी प्रतिथयश उद्योजक व व्यासायिक म्हणून ख्यातकिर्त पावली. सहकार चळवळीच्या माध्यमातून शहराप्रमाणेच ग्रामीण भागातील नवीन मध्यम वर्ग उदयास आला.

सहकारी चळवळीच्या माध्यमातून सुरू झालेल्या शिक्षण संस्थांत आपले शिक्षण पूर्ण करून ग्रामीण भागातील अनेक तरुणांनी युरोप, अमेरिकेत सुध्दा नावलौकीक मिळविला. सहकार चळवळीने समाज परिवर्तनाच्या कामी केलेले योगदान निश्चितपणे एकमेवाद्वितीय ठरते.

**सहकारी चळवळीने जिल्ह्याच्या शेत पाणी पुरवठ्याच्या कामी केलेल्या योगदानाचा इतिहास:**

अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रातील प्रमुख दुष्काळी जिल्ह्यांपैकी एक होता. त्या पार्श्वभूमीवर सन १९१५ ते सन. १९४७ या काळात ब्रिटीश सरकारने जलसंधारणाच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या. यात प्रवरा नदीवरील भंडारदरा धरणाचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. प्रवरा आणि गोदावरी कालव्यामुळे जिल्ह्यातील उत्तर भागाच्या शेतीचा काही प्रमाणात विकास झाला. त्या परिसरात ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात येऊ लागले. त्यातून सहकारी साखर कारखानदारीची चळवळ उभी राहिली. परंतु उर्वरित अहमदनगर जिल्ह्याचे चित्र मात्र फारसे बदलले नाही. पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने शेतीचे प्रश्न गंभीर बनत गेले. म्हणून पाण्याच्या पर्यायी उपलब्धतेकडे लक्ष देणे आवश्यक होते. सन १९७२ सालच्या दुष्काळाची झळ अहमदनगर जिल्ह्याला जास्तच जाणवत होती. परिणामी पाणी प्रश्नाचे महत्व सहकार चळवळीत काम करणाऱ्या लोकांच्या लक्षात येत होते. सन १९७२ साली स्थापन केलेल्या पहिल्या पाणी पुरवठा आयोगाचे सदस्य कॉम्रेड दत्ता देशमुख अहमदनगर जिल्ह्यातलेच असल्याने सहकार चळवळीने हा प्रश्न सोडविताना त्यांनी आखून दिलेल्या 'पाणी अडवा पाणी जिरवा' या योजनेचा पुरेपूर वापर करून घेण्याचे ठरविले.

शेतीची उत्पादकता वाढवून ग्रामीण भागाच्या परिवर्तनसाठी पाण्याची नितांत आवश्यकता होती. यासाठी सहकार चळवळीने खास निधी उभारण्याच्या योजना आखल्या. सहकारी साखर कारखान्यांनी पाणी फंडाची स्थापना केला. तर काही ठिकाणी सहकारी तत्वावर उपसा जलसिंचन योजना राबविणासाठी सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. सहकारी चळवळीच्या माध्यमातून या सर्व प्रयत्नांमुळे शेतीसाठी पाणी पुरवठ्याच्या वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या. सहकारी चळवळीच्या माध्यमातून वसंत बंधारे, कोल्हापूर बंधारे, अशोग बंधारे, दगडी साठवण बंधारे, पाझर तलाव, गाव तळी अशा विविध प्रकारच्या पाणी अडविण्याच्या योजना पूर्ण केल्या गेल्या. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, कोपरगाव, श्रीगोंदा, जामखेड इत्यादी तालुक्यातून सहकारी तत्वावर उपसा जलसिंचन योजना राबविण्यात आल्या.

पाणी पुरवठ्याच्या अशा सर्व योजना अत्यंत खर्चिक होत्या उदा. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचा बांधकाम खर्च काही लाखात असे. त्यामुळे त्याकाळी व्यक्तिगत किंवा गाव पातळीवर ही कामे शक्य नव्हती. तर सरकार दरबारी कामाच्या मंजूरीला वेळ लागणार होता किंबहुना पैशाचीही

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

अडचण होतीच. परंतु सहकार चळवळीने या योजना हाती घेतल्यामुळे कोणत्याही प्रकारचे कालहरण न होता ग्रामीण भागाचे तसेच शेतीचे परिवर्तन लवकरात लवकर होवू शकले.

**सहकारी पाणी पुरवठ्याच्या माध्यमातून झालेले जलसंवर्धन:**

सहकार चळवळीने हाती घेतलेल्या पाणी पुरवठ्यांच्या योजनांमुळे फक्त शेतीसाठी पाणी उपलब्ध होवून लोकांच्या पाण्याचा प्रश्न सुटला एवढेच नव्हे तर यामुळे जलसंवर्धनाच्या कामास हातभार लावला. कारण कोल्हापूर बंधारे, दगडी साठवण बंधारे, गाव तळी, पाझर तलाव आणि मातीच्या बंधाऱ्यामुळे परिसरातील पाण्याची पातळी वाढून लोकांच्या विहीरींना जास्त पाणी मिळू लागले.

पाणी पुरवठ्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकार चळवळीने फक्त सार्वजनिक स्वरुपाची कामे केली नाहीत तर, व्यक्तिगत शेतकऱ्यांना सुध्दा आर्थिक पुरविण्याचे काम केले. लोकांना शेतावर विहीरी खोदणे, विहीरीतील गाळ काढणे, विज पंप बसविणे, पाईप लाईन टाकणे इत्यादी कामांसाठी आर्थिक मदत्ती देवू केल्या. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीने सुरू केलेल्या जलसिंचनाची यादी खूप मोठी होईल. परंतु उदाहरणादाखल काही ठिकाणी सुरू केलेल्या योजनांची नावे आवश्यक म्हणून नोंदविली तर त्यात अनुक्रमे; श्री सरस्वती उपसा जलसिंचन संस्था,दत्त दिगंबर सहकारी उपसा जलसिंचन संस्था, माहेगाव देशमुख, कुंभारी माहेगाव-सहकारी पाणी पुरवठा सस्था, कुंभारी, श्री गुरुवर्य तुकाराम बाबा उपसा जलसिंचन संस्था मर्यादित कुंभारी, श्री संत ज्ञानेश्वर माऊली सहकारी उपसा जलसिंचन संस्था, ठाणगाव, श्रीराम सहकारी उपसा जलसिंचन संस्था,जगदंबा सहकारी उपसा जलसिंचन संस्था योजना, व मांडवा सहकारी उपसा जलसिंचन संस्था मांडवा, तालुका पारनेर. त्याचप्रमाणे पारनेर तालुक्यातील निघोज, देवीभोयरे, चोभूत इत्यादी ठिकाणी सहकार चळवळीच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

पाणी पुरवठ्याच्या कामात फक्त सहकारी साखर चळवळीनेच काम केले असे नाही तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेने सुध्दा तालुका खरेदी-विक्री संघाच्या माध्यमातून लोकांना त्यांच्या विहीरीवर पंपसेट बसविण्यास मदत केली. उदाहरणार्थ सन १९७४ च्या दरम्यान किर्लोस्कर कंपनीतील भैयासाहेब पाध्ये आणि खांडेकर या दोन अधिकाऱ्यांना विश्वासात घेवून सहकारी खरेदी-विक्री संघाने लोकांना उधारीवर पंपसेट देण्याची सोय उपलब्ध करून दिली.

त्याचप्रमाणे सन १९७७-७८ च्या दरम्यान पारनेर तालुक्यातील जवळ जवळ दोन हजार शेतकऱ्यांना त्यांच्या विहीरीवर पाण्यासाठी विज पंप बसवून देण्याच्या कामी सहकार चळवळीने महत्वाची भूमिक पार पाडली. ज्या ठिकाणी नद्यांचे पाणी उपलब्ध होते तेथे सहकारी चळवळीने उपसा जलसिंचन योजना आणि साठवण बंधाऱ्याचे धोरण स्वीकारले. तर जेथे अशा प्रकारचे मुबलक पाणी नव्हते अशा अहमदनगरच्या दक्षिण भागात विहीरी, पंपसेट आणि पाईपलाईन टाकण्यासाठी मदत केली. स्वत:चा प्रपंच जिद्दीने उभा करावा त्याचप्रमाणे जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी संपूर्ण जिल्ह्याच्या परिवर्तनाची काळजी घेतली.

अहमदनगर जिल्ह्यात कमी झालेले पावसाचे प्रमाण आणि पाण्याच्या वाढीव वापरामुळे सन १९८० नंतरच्या काळात पाणी टंचाई जास्तच जाणवू लागली. ठिकठिकाणी साठवण बंधारे झाल्यामुळे प्रत्येक बंधाऱ्याच्या वाट्याला येणारे पाणी कमी पडले. विहीरींची संख्या वाढून अविरत उपसा झाल्याने जमीनीतील पाण्याची पातळी सुध्दा कमी झाली. त्यामुळे बदलत्या

काळात जिल्ह्यातील शेतकऱ्या समोर असलेल्या पाण्याच्या प्रश्नाने भीषण रुप धारण केले. या प्रश्नाची तीव्रता पूर्वीपेक्षा अधिक वाढली. अशा वेळी सहकारी चळवळीने पाणी प्रश्न सोडविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा आधार घेतला. यासाठी आवश्यक असणारा पैसा सहकार चळवळीने अनुदान आणि कर्जाच्या स्वरुपात पुरविला. नवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी लोकांच्या प्रशिक्षणाचे कार्यक्रम हाती घेतले. एवढेच नव्हे तर तंत्रज्ञानात अग्रेसर असणाऱ्या ईस्त्राईल सारख्या देशांचे दौरे सहकारी संस्थांच्या माध्यमातून आयोजित केले गेले. ज्या प्रमाणे परिस्थिती बदलत जावून प्रश्नाचे स्वरुप बदलते त्यानुसार सहकार चळवळीने त्यांची सोडवणूक करण्यासाठी आपल्या भूमिकेत सुध्दा कालानुरूप बदल केले.

**पाणी परिषदा आणि दुष्काळ परिषदांच्या माध्यमातून लोकांना मदतीचा हात:**

अहमदनगर जिल्हा पूर्वीपासून दुष्काळी असल्याने शेतीविषयक सर्व प्रश्नांच्या मुळाशी पाण्याचा तुटवडा हे एकमेव कारण होते. सरकारी पातळीवर स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर प्रयत्न झाले याबद्दल दुमत नाही. मोठमोठ्या धरणांची निर्मिती केल्यामुळे सरकारी पातळीवर हा प्रश्न काही प्रमाणात सुटला. अर्थात यामुळे जिल्ह्याचा संपूर्ण भाग ओलिताखाली येईल अशी अपेक्षा करणे चूकीचे होते. व्यक्तिगत पातळीवर हा प्रश्न लोकांनी हाती घेणे शक्य नव्हते. सहकार चळवळीने आपल्या काही योजना राबवून एका मर्यादेपर्यंत पाणी प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. या प्रश्नाची व्यापकता खूपच मोठी असल्याने विविध पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे होते. सातत्याने पडणारा दुष्काळ आणि पाण्याची चणचण आणि उपलब्ध पाण्याचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना पाणी वापराच्या शिक्षणाची आवश्यकता होती. तसेच सरकार दरबारी या प्रश्नाचा रेटा वाढविणे सुध्दा आवश्यक होते. प्रसंगी न्यायालयीन लाढाईची गरज होती. या सर्व दृष्टीकोनातून जिल्ह्यातील सहकार चळवळीने वेळोवेळी प्रयत्न केले. पाणी परिषदांचे आयोजन करून, परिषदांसाठी सरकारी अधिकारी आणि मंत्रीगण बोलावून त्यांना या प्रश्नाची तीव्रता समजावून देवून ते सोडविण्याचे प्रयत्न केले. त्याचप्रमाणे वेळोवेळी दुष्काळ परिषदांचे सुध्दा आयोजन अहमदनगर जिल्ह्यातील सरकारी संस्थांनी केले आणि सहकारी पातळीवर या प्रश्नाचे दखल घेणे भाग पाडले.

सर्व प्रकारचे प्रयत्न करून सुध्दा जेव्हा काही वेळी पाणी प्रश्न सुटत नाही आणि सरकारी यंत्रणा ऐकत नाही तसेच पाण्याचा दुरूपयोग थांबत नाही. अशा वेळी सहकार चळवळीने सार्वजनिक पातळीवर न्यायालयीन पायरी सुध्दा चढली. प्रसंगी सरकारच्या विरोधात दावे दाखल करण्यात आले. आणि अहमदनगर जिल्ह्यातील पाणी प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सहकारी चळवळीने केला. न्यायालयीन लढाई करताना सहकारी चळवळीने ग्राहक मंचाकडे सुध्द आपल्या तक्रारी नेल्या. नुकसान होणाऱ्या शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्याच्या कामी मदत केली.

पाणी प्रश्न सोडविताना सहकारी चळवळीने मोठ्या प्रमाणात गुंतवणूकी केल्या. या गुंतवणूकी मागे कोणत्याही प्रकारच्या नफ्याची अपेक्षा नव्हती, तर पाणी उपलब्ध होवून शेती विकास आणि लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारून जिल्ह्याचे समाज जीवन सर्व अंगाने बदलावे एवढीच अपेक्षा सहकारी चळवळीला होती.

**सहकार चळवळीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या शेती सुधार योजनेचा इतिहास:**

सहकार चळवळ म्हंटले की, महाराष्ट्राच्या बाबतीत लोकांसामोर लगेच सहकारी कारखानदारी उभी राहते. अहमदनगर जिल्ह्याची सहकार चळवळ साखरेपुरती मर्यादित राहीली नाही. तसेच पाणी प्रश्न सोडवून जिल्ह्यातील सहकार चळवळ थकली अथवा थांबली नाही. शेती विकासाचे सर्वांगिण स्वरुप बदलण्यासाठी जिल्ह्याच्या सहकार चळवळीने सातत्याने प्रयत्न करून अनेक योजना आखल्या आणि अंमलात आणल्या. सन १९५० ते १९६० हे दशक असे होते कि,

या काळात जिल्ह्यातील साखर चळवळीच्या विकासाचा वेग अधिक होता. मुख्य म्हणजे सरकार सुध्दा अनुकूल होते. आणि दरम्यानच्या काळात सहकारी चळवळीचे नेतृत्व राजकीय सत्तेत डेरेदाखल झाले होते. परिणामी या लोकांचा अनेक तज्ञ आणि उच्च शिक्षित लोकांशी संपर्क आला. तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट आणि डेक्कन शुगर असोशिएशन या संस्थांचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने शेती विकासाच्या अनेक पुरक योजनांना हात घातला आणि सहकार चळवळ त्यामध्ये यशस्वी झाली.
शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या कंपोस्ट खताची निर्मिती करण्याचे प्रकल्प सुरू केले. साखर कारखान्यातून बाहेर पडणारी मळी यासाठी वापरात येवू लागली. शेतकऱ्यांना हे कंपोस्ट खत स्वस्त दराने मिळू लागले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा दुध धंदा किफायतशीर चालण्याच्या कामी सुध्दा सहकार चळवळीने मदत केली. सहकारी तत्वावर अनेक पशुखाद्य निर्मितीचे कारखाने उभे राहिले. या कारखान्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अल्प व्याजदराने कर्ज मिळाले. नफा मिळविण्याऐवजी शेतकऱ्यांचा विकास होणे हे कारखान्यांचे उद्दिष्ट असल्याने शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात पशुखाद्याची उपलब्धता होवू लागली. त्याचप्रमाणे कोंबडी पालन उपक्रम सुरू करून सहकार चळवळीने कुक्कुटपालन माध्यमातून शेतकऱ्यांना आणखी एक जोड धंदा उपलब्ध करून दिला. त्याचप्रमाणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी सहकारी तत्वावर कुक्कुटपालन आणि शेळीपालनाच्या संस्था उभ्या राहिल्या. या संस्था जिल्ह्यातील शेती उद्योगाला पुरक ठरल्या. या सर्व संस्था चालविण्याच्या मागे त्यागाची भूमिका होती. त्यामुळे काटकसरीच्या माध्यमातून संस्थांना मोठ्या प्रमाणात नफा झाला आणि शेतकऱ्यांचा उत्साह वाढीस लागला.
जमीन सपाटीकरणाच्या कामात सुध्दा सहकार चळवळीने आपले योगदान देवून पडीक जमीनी लागवडीखाली आणल्या. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सुधारीत दर्जाचे बियाणे, रासायनिक खते, तणनाशके इत्यादी साठी सहकाराच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करून देण्यात आले.
सरकारी पातळीवर दुधाच्या महापूराची योजना अंमलात आल्यानंतर जिल्ह्याच्या परिसरात संकरीत गायी दिसू लागल्या. या गायींच्या किंमती खूप जास्त होत्या. त्यासाठी अधिक पैशाची आवश्यकता होती. यासाठी सहकारी चळवळीने तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ठिकाणी कृत्रीम गोपैदास केंद्रांची स्थापना केली. त्यामुळे येथील गावरान गायींच्या पोटी संकरीत गायीचा जन्म स्वस्तात करणे शक्य झाले. परिणामी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात दुधाचा धंदा भरभराटीस येवून शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत अमुलाग्र बदल झाला.
खते, औषधे आणि तणनाशकांचा पुरवठा करताना तर सहकार चळवळीने रोख पैशाची सुध्दा अपेक्षा कधी केला नाही. या सर्व साधनांची उधारीवर सोय करण्यात आली. त्यामुळे पैशासाठी लोकांचा शेतीविकास सहकारी चळवळीने थांबू दिला नाही.
पावसाचे कमी झालेले प्रमाण सुधारण्यसाठी सरकारी पातळीवर अलिकडच्या काळात वनीकरणाची मोहिम सुरू झाल्याचे दिसून येते. अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीने या संदर्भात सुरूवातीपासून कार्य केले. गावातील शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे तसेच रस्त्यांच्या कडेने वनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. वनीकरणाच्या कामी लोकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून सहकाराच्या माध्यमातून लोकांसाठी मोफत रोपवाटीका सुरू करण्यात आल्या.

**सहकार चळवळीच्या माध्यमातून जोडधंद्याचा विकास:**

उपरोल्लेख केल्याप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ विशिष्ट कार्यापुरतीच मर्यादित राहिली नाही तर सहकाराच्या माध्यमातून अनेक जोडधंदे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात उभे राहून रोजगारांच्या संधीत वाढ झाली. त्यामुळे लोकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा

होवून ग्रामीण जीवनमान पूर्ण बदलले. त्याचप्रमाणे लोकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. या कामी प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो म्हणजे, कुक्कूटपालन व दुध व्यवसायाचा. तसेच जिल्ह्यात अनेक ठिकाणी सहकारी तत्वावर औद्योगिक संस्था उभ्या राहिल्या. दुधाच्या व्यवसायाने तर फार मोठ्या प्रमाणात रोजगार आणि पैसा मिळवून दिला. यासाठी लोकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरूवातीच्या काळात सहकार चळवळीने लोकांना संकरीत गायी घेवून दिल्या. कृत्रिम गोपैदास केंद्राच्या स्थापना केल्या. यांचा परिणाम असा झाला की, गावोगावी सहकारी दुध उत्पादकांच्या संस्था उभ्या राहिल्या. या सहकारी दुध उत्पादकांचे संघ निर्माण झाले. वर्षाकाठी जिल्ह्यातील दुध व्यवसायाची उलाढाल शेकडो कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली. सहकारी दुध संस्थांना चळवळीने सर्वोतोपरी मदत केली. या संस्थांनी खाद्य आणि जनावरांच्या आरोग्याच्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी स्वीकारली. परिणामी ग्रामीण लोकांसाठी हा धंदा सोपा होऊन त्यांची आर्थिक परिस्थिती बदलली.

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी बॅंक चळवळीचे योगदान:**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी बॅंक व्यवसायाच्या इतिहासाची तपासणी करताना जिल्ह्यातील सहकाराचे हे क्षेत्र बहूविध स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, शेतमजूर, उद्योजक आणि व्यावसायिक सहकार चळवळीमुळे नव्याने निर्माण झालेल्या नोकरदार मध्यम वर्गाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी वेळेवर पुरेशा कर्ज पुरवठ्याची आवश्यकता होती. जिल्ह्यातील सहकारी पत संस्था आणि इतर सहकारी संस्थांना पत पुरवठ्याच्या कामी आपलीशी वाटणारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकाराने स्थापन झाली. या बॅंकेच्या स्थापनेच्या कामी पद्मश्री विखे पाटील आणि शंकरराव काळे यांच्या सारख्या सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांनी कष्ट घेतले. त्यानंतर अहमदनगर जिल्ह्याच्या परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक पत संस्था आणि इतर सहकारी बॅंका अस्तित्वात आल्या. या संस्थांच्या उभारणीचा खर्च सुरूवातीच्या काळात संबंधित साखर कारखान्यांनी उचलला.

सहकारी पतसंस्था आणि वेगवेगळ्या बॅंकांच्या माध्यमातून काटकसर, बचत, स्वावलंबन आणि सहकाराच्या भावनेची जाणीव ग्रामीण भागातील जनतेला झाली. नंतरच्या काळात या सहकारी बॅंका इतर कोणत्याही व्यापारि बॅंकेपेक्षा कमकुवत नाहीत हे सिध्द झाले. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो म्हणजे प्रवरा सहकारी बॅंक आणि कोपरगाव परिसरातील गौतम सहकारी बॅंकेचा.

त्याचप्रमाणे इतर अनेक ठिकाणी वेगवेगळ्या वर्गातील लोकांच्या पतपेढ्या निर्माण झाल्या. या पतपेढ्यांच्या यादीत वेगवेगळ्या सहकारी साखर कारखान्यांनी सुरू केलेल्या पतपेढ्या, प्राथमिक शिक्षकांच्या पतपेढ्या, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या पतपेढ्या, माध्यमिक शिक्षकांच्या पतपेढ्या, वीज मंडळ कर्मचाऱ्यांच्या पतपेढ्या, व इतर अनेक संस्थांची नावे घेता येतील.

अहमदनगर जिल्ह्याच्या परिसरात स्थापन झालेल्या या आर्थिक सहकारी संस्थांनी दैनंदीन गरजांसाठीच कर्ज पुरवठा केला असे नव्हे तर, संबंधित लोकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक अनुदानाने व सवलतीच्या दरात कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे या सहकारी आर्थिक संस्थांनी फक्त श्रीमंत आणि वरच्या जातीच्या लोकांसाठीच काम केले असे नाही तर आर्थिक दृष्ट्या गरीब, दुर्बल आणि मागासलेल्या जातींकरिताही आद्यक्रम दिला.

थोडक्यात जिल्ह्यातील सहकारी बॅंक चळवळीने समाजाच्या प्रत्येक घटकांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचण्याचा प्रयत्न केला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्य योगदानाबद्दल वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता नाही. कारण या सर्व बॅंका आणि पतसंस्थांच्या यशस्वीतेमागे जिल्हा सहकारी बॅंक सुरूवातीपासून ठामपणे उभी होती हे निश्चित.

खरे म्हणजे ग्रामीण विकासाचा विचार करताना या आर्थिक संस्था मोठ्या आहेत की छोट्या याचा विचार महत्वाचा नसून ग्रामीण जनतेला किती सहजपणे आणि सुलभरित्या अर्थसहाय्य उपलब्ध केले गेले ही बाब महत्वाची मानली गेली. एके काळी सावकार आणि व्यापाऱ्यांच्या जोखडात अडकलेला अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी शेतकरी आणि कष्टकरी वर्ग वेगाने प्रगती करताना दिसू लागला. तो या सहकारी वित्तसंस्थांच्या जाळ्यांमुळेच. जिल्ह्यातील मुख्या आर्थिक गरज पूर्ण करून ग्रामीण समाजाच्या सर्वांगिण विकासाला पूरक ठरणाऱ्या छोट्या मोठ्या उद्योगांना चालना देण्याचे काम या संस्थांनी केले. त्यामुळे ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी वाढून जीवनमान उंचावले आणि परिसराचा कायापालट करण्यात मोठे यश मिळाले.

**शेतमजूर आणि दुर्बल घटकांना सहकार चळवळीकडून मदतीचा हात:**

अहमदनगरच्या उत्तर भागापेक्षा दक्षिण भाग तुलनेने मागासलेला आणि अनेक प्रश्नांच्या जाळ्यात अडकलेला होता. उत्तरेत कालव्याचे पाणी असल्यामुळे सहकारी साखर कारखानदारी आणि त्या अनुषंगाने होणारा विकास मोठ्या प्रमाणावर झाला होता. अहमदनगरच्या दक्षिण भागातील परिसरातील श्रीगोंदा, कर्जत, जामखेड हे तालुके कमालिचे मागासलेले राहिले. पावसाचे अत्यंत कमी प्रमाण आणि पुन्हा पुन्हा पडणार दुष्काळ यामुळे रोजगारीचा प्रश्न कठीण होता. दलित व मागासवर्गीयासमोर असणाऱ्या अडचणी यापेक्षा अधिक होत्या. त्यामुळे या भागातील पाणी प्रश्न, शेती प्रश्न आणि रोजंदारीचा प्रश्न सोडविणे अत्यंत कठीण होते. सहकार चळवळीने या भागातील लोकांच्या प्रश्नांना काहीसा वेगळ्या पध्दतीने हात घातला. गावा-गावातून दुध सोसायट्यांची स्थापना केली. त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढून लोकांना थोडाफार आर्थिक आधार मिळाला. शेतकरी अठरा विश्व दारिद्र्यात होता. मुले मुंबईत छोटी-मोठी कामे करायची तेव्हा त्याला पैसा बघायला मिळायचा. सहकार चळवळीने या भागात दुधाचा धंदा उभा करण्यासाठी प्रयत्न केले. चांगल्या दुध देणाऱ्या गायी घेण्यासाठी मार्गदर्शन केले. या भागातील पाण्याचा प्रश्न जसा गंभीर होता तसाच असंघटीत मजूरांचा प्रश्न अवघड होता. सहकार चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्याची चिंता असायची त्यातून असंघटीत मजूरांसाठी सहकारी चळवळीकडून मजूर सहकारी संस्था स्थापन्याच्या कामी पुढाकार घेण्यात आला. थोड्याच काळात आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेले हजारो असंघटीत मजूर संस्थांचे सभासद झाले. किरकोळ स्वरुपाच्या रोजंदारीसाठी मुंबईपर्यंत होणारी मजल दरमजल थांबली. मजूर सहकारी संस्थांच्या माध्यमातून एकट्या पारनेर सारख्या दुष्काळी तालूक्यात पंधरा ते सोळा हजार मजूरांना रोजगार उपलब्ध झाला.

मजूर सहकारी संस्थांची स्थापना होताना समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि मागासलेल्या जातींना फायदा झाला. या मजूर सहकारी संस्थांना सरकारची विकासकामे आद्यक्रमाने मिळू लागली. ग्रामीण भागतील रस्ते बांधणी, तसेच जलसंधारणांच्या कामांना वेग आला. वेगवेगळ्या जातींच्या मजूर सहकारी संस्था स्थापन झाल्या. उदाहरणार्थ कातडी कमविण्याच्या उद्योगाला चालना देण्यासाठी चर्मकार सहकारी उद्योग संस्था स्थापन झाल्या. दलित व अदिवासींच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. सहकारी चळवळीत दलितांना सामावून घेण्यासाठी त्यांच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेला जिल्ह्यात आद्यक्रम देण्यात आला. तसेच जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या सहकारी संस्थांना अनुदानाच्या मदतीचा हात देण्यात आला.

एकेकाळी पोटापुरते कमविण्यसाठी या भागातील तरुण मुंबईपर्यंत जात होता. कारण येथील शेती वर्षभर ओस पडलेली असायची. सहकार चळवळीच्या माध्यमातून विकासाला सुरूवात झाल्यानंतर या भागतील लोकांना जलसंधारण, शेतजमीन विकास, पिण्याचे पाणी यासारख्या

अनेक योजना सहकारच्या माध्यमातून हाती घेत आल्या. या सर्व कामाकरीता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेने अनुदान आणि माफक व्याज दराने कर्जाचा पुरवठा केला. अशा प्रकारे लोकांची आर्थिक परिस्थिती बदलत जावून हळूहळू हा भाग सुध्दा सहकारी चळवळीच्या दिशेन मार्गस्थ झाला. परिसरातील जलसंधारण आणि नंतरच्या काळात सहकार व सरकारच्या पाणी पुरवठा योजनांची जोड मिळाल्यामुळे या भागातील ऊस लागवडीखालील क्षेत्र वाढले. त्यामुळे एकेकाळी दुष्काळी गणल्या जाणाऱ्या पारनेर आणि श्रीगोंदा तालुक्यात सहकारी साखर कारखाने उभे राहिले. हीच परिस्थिती अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी, कर्जत, जामखेड तााालुक्यांची होती. सहकार चळवळीने कसोशिने प्रयत्न केल्यामुळे या तालुक्यात सुध्दा सहकारी साखर कारखाने आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या विकासाच्या सर्व योजना राबविणे शक्य झाले. थोडक्यात; अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने फक्त सधन भागालाच विकासाच्या दिशेने नेले नाही तर परंपरागत दुष्काळी भागातील रोजी रोटी आणि शेतीचे प्रश्न सोडविण्याचे यशस्वी उद्योग केले.

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ व कापूस आणि कापड धंद्याचा संबंध:**

पूर्वीच्या काळी अहमदनगर जिल्ह्यात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जात असे. कमी पाण्यावर येणारे हे पीक दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचा आधार होते. या उत्पादनाची सर्व बाजारपेठ खाजगी व्यापारी मंडळींच्या हातात असल्याने शेतकऱ्यांच्या पदरात मात्र काहीच पडत नव्हते. कापसाच्या विक्रीसाठी जिल्ह्यातील शेतकरी परावलंबी होता. हा प्रश्न सहकार चळवळीच्या नजरेतून सुटणे शक्य नव्हते. त्यामुळे नंतरच्या काळात जिल्ह्याच्या विविध भागात सहकारी तत्वावर स्पिनिंग मिल आणि सुत गिरण्या उभ्या राहिल्या. या सुत गिरण्यांनी तयार केलेले सुत थेट कापड कारखान्यांना विकले जावू लागले. परिणामी मध्यस्थांचे उच्चाटन झाले. शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव मिळू लागला आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलली. महाराष्ट्र सहकारी बॅकेने सुध्दा या कामासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली.

परंतु या संदर्भात जिल्ह्यातील सहकार चळवळीचा भविष्यकाळ फारसा उज्वल नव्हता असेच नंतरच्या काळात दिसून आले. कारण एक सहकारी कारखानदारी वाढल्याने आणि पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्याने जिल्ह्यातील शेतकरी ऊस उत्पादनाकडे वळला. आणि दुसरे कारण म्हणजे सहकार चळवळीने ज्या कापूस प्रक्रिया उत्पादनाची सुरूवात केली त्यांना बाजारपेठ मिळविण्यात अपयश आले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून उत्पादित होणाऱ्या साखरेचे मोठे प्रमाण केंद्र आणि राज्य सरकार मार्फत खरेदी केले जात असे. त्यामुळे साखर कारखान्यांना बाजारपेठे संदर्भात फारशी अडचण आली नाही. दुर्दैवाने कापूस उत्पादनाच्या बाबतीत मात्र अशी परिस्थिती नसल्याने जिल्ह्यातील सहकार चळवळीला अपयशाचा कटू अनुभव सहन करावा लागला. जिल्ह्यातील राहूरी, श्रीरामपूर इत्यादी ठिकाणी सहकारी तत्वावर सुत गिरण्या स्थापन झाल्या होत्या. विक्री व्यवस्थेच्या अडचणीमुळे या संस्था कर्जबाजारी झाल्या. अर्थात महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातील सुत गिरण्यांचा अनुभव असाच आहे. उदाहरणार्थ कोल्हापूरची छत्रपती शाहू मिल, सोलापूर येथील श्री लक्ष्मी मिल आणि नागपूरची सुत गिरणी या सर्व सुत गिरण्या महाराष्ट्र सरकारच्या मालकीच्या असून सुध्दा आर्थिक अडचणीत सापडल्याचा इतिहास आपल्याला ठावूक आहे. अर्थात या उदाहरणांच्या सहाय्याने अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी सुत गिरण्यांच्या अपयशाचे समर्थन शक्य नव्हे तर महाराष्ट्रातील कापूस आणि सुत उद्योगासमोर सरकारी, सहकारी तसेच खाजगी पातळीवर ज्या अडचणी या

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

उद्योगासंदर्भात अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीसमोर आल्या आणि या क्षेत्रास अपयशाला सामोरे जावे लागले याचा विचार मनात येतो.

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचे राजकीय योगदान:**

अहमदनगरच्या सहकार चळवळीचे राजकीय क्षेत्राला झालेले योगदान फार मोठे मानावे लागेल. राजकीय योगदानाच्या संदर्भात विचार करताना स्थानिक, जिल्हा, राज्य आणि देश पातळीपर्यंत दृष्टीक्षेप जातो. स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्हा पातळीवर लोकल बोर्ड तर राज्य पातळीवर प्रांतीय मंत्रीमंडळाच्या स्थापना झाल्या होत्या. त्याचप्रमाणे देशाच्या केंद्रीय स्थानी राष्ट्रीय असेंब्लि अस्तित्वात होती. या सर्व पातळ्यांवर काम करणाऱ्या प्रतिनिधीत फक्त शहरी, उच्चवर्णीय आणि उच्चशिक्षितांचाच समावेश होता. देशातील ग्रामीण भागातील क्वचितच एखाद्याला या मंडळावर काम करण्याची संधी अपवादानेच लाभली असेल. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने मात्र हे चित्र नंतरच्या काळात बदलविले.

अहमदनगर जिल्ह्यात स्वातंत्र्य पूर्व काळापासून सहकार चळवळीने जोर धरला. स्वातंत्र्यानंतर विविधांगी सहकार चळवळ फोफावली. यामध्ये साखर कारखानदारी अग्रेसर होती. त्याचप्रमाणे इतर वेगवेगळ्या उद्दिष्टांकरीता स्थापन झालेल्या सहकारी संस्थांची संख्या प्रचंड मोठी झाली. पर्यायाने समाज परिवर्तनाचे साधन आणि समाज सेवेकरिता काम करण्याची संधी या स्वरुपात जिल्ह्यातील सहकार चळवळ पुढे आली. सुरूवातीलाच उल्लेख केल्याप्रमाणे शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर वाढला आणि ग्रामीण भागात नवशिक्षित तरुणांचा वर्ग निर्माण झाला. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाज कार्यासाठी करताना सहकार चळवळ ही एक संधी वाटली. अनेक सुशिक्षितांनी आपला नोकरी व व्यवसाय सोडून स्वातंत्र्य चळवळीप्रमाणे सहकार चळवळीत उडी घेतली. कामाच्या माध्यमातून त्यांचा लोकसंपर्क वाढला. पर्यायाने आपोआपच समाज सेवेतून राजकारणाकडे वळले. नंतरच्या काळात आलेल्या निवडणूका या लोकांनी लढविल्या आणि जिंकल्या व सहकार चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांना राजकीय क्षेत्रात मानाची पदे मिळाली. यातील कित्येकजण सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, खासदार आणि केंद्र व राज्य सरकारात मंत्री झाले. जिल्ह्याच्या संदर्भात एक ना अनेक उदाहरणे देता येतील. उदाहरणार्थ आण्णासाहेब शिंदे, के. जी. खताळ, कॉम्रेड दत्ता देशमुख, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, भाऊसाहेब थोरात, बाळासाहेब विखे पाटील इत्यादी. आण्णासाहेब शिंदे भारताच्या केंद्रीया मंत्री मंडळात पंधरा वर्षे कृषि मंत्री पदावर राहिले. प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या पहिल्या संचालक मंडळात त्यांचा समावेश होता. शंकरराव काळे व बी. जे खताळ यांनी महाराष्ट्रात मंत्रीपदे भुषविली. दत्ता देशमुख हे भारताच्या पहिल्या जल आयोगाचे सदस्य होते, तर बाळासाहेब विखे हे जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय राजकारणात गाजले हे सर्व सहकारी चळवळमुळेच झाले. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने मागासवर्गीय जातीतील कार्यकर्त्यांना सुध्दा राजकारणात सामावून घेतले, त्यांना अनेक ठिकाणी मानाच्या जागा दिल्या.

**केंद्र, राज्य सरकार आणि अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ:**

राजकीय सत्ता आणि अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा इतिहास पाहिला तर 'चळवळीतून राजकीय सत्ता आणि राजकीय सत्तेद्वारा सहकार चळवळीला हातभार' अशा प्रकारचा असल्याचे दिसून येते. सहकार चळवळीतील अनेक कार्यकर्ते राजकारणाच्या मोठ्या पदावर जावून पोहोचले. अनेकजण आमदार, खासदार आणि मंत्री झाले. त्यांच्या सार्वजनिक काम करण्याच्या पध्दतीला वारसा तर होताच त्याचप्रमाणे सहकार चळवळी बद्दल कृतज्ञतेची भावना सुध्दा होती. त्यामुळे या लोकांनी राजकीय सत्तेचा वापर सहकार चळवळीच्या

भरभरासाठीच केला. सहकाराच्या माध्यमातून होणाऱ्या ग्रामीण विकासाची या लोकांना कल्पना होती. त्यामुळे त्यांनी सहकार चळवळीच्या मदतीवर लक्ष केंद्रीत केले. परिणामे शासकीय पातळीवर सहकार चळवळीला पुरक ठरणाऱ्या अनेक योजना अंमलात आल्या. शासनामार्फत सहकार चळवळीला भरघोस आर्थिक मदत सुध्दा प्राप्त झाली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या काळात अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ अधिक वेगाने फोफावली. सहकारी साखर कारखान्याच्या भाग भांडवलासाठी केंद्र व राज्य सरकारांनी मदतीची धोरणे आखली. त्यामुळे सुरूवातीच्या काळात जिल्ह्यातील सहकारी चळवळीसमोर ज्या आर्थिक अडचणी आल्या होत्या त्या नंतरच्या काळात कमी झाल्या. थोडक्यता सहकार चळवळीच्या माध्यमातून राजकारणात स्थानापन्न झालेल्या या लोकांनी सहकार चळवळीचे ऋण फेडले आणि सहकार चळवळ आणि राजकीया सत्ता यांचा दुहेरी संबंध अधिक वृध्दिंगत झाला.

**सहकार विषयक शिक्षण:**

जिल्ह्यातील सहकार चळवळीने परंपरागत तांत्रिक आणि आरेग्य शिक्षणाच्य बाबतीत जरूर योगदान दिले. परंतु सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी आणि कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण दिले नाही. याचा अर्थ त्यांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नाही असा नाही. अर्थात ही सोय सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आली. सहकार विषयक शिक्षण देणारी राष्ट्रीया पातळीवर पुणे येथे 'वैकुंठ मेहता सहकार प्रशिक्षण प्रबोधिनी' ची स्थापना झाली. अर्थात नगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने इतर शिक्षण संस्था प्रमाणेच सहकार विषयक प्रशिक्षण देणारी प्रशासक आणि कार्यकर्त्यांसाठी संस्था स्थापन केली असती तर स्थानिक पातळीवर शिक्षणाची सोय होवून सहकार चळवळीत आणखी प्रगल्भता आली असती. अर्थात यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचे काहीही नुकसान झाले नाही. कारण या क्षेत्रात काम करण्यासाठी प्रशिक्षणाऐवजी त्याग आणि जिद्दीची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा त्याग आणि जिद्द अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीत काम करणाऱ्या लोकांकडे होती. म्हणून त्याच्या जोरावर त्यांनी सहकार चळवळ बहूस्पर्शी करून यशस्वी केल्याचा इतिहास सापडतो.

**अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळ आणि घराणेशाही तसेच वर्गकलहाचा मागोवा:**

अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीलच्या इतिहासाविषयी प्राथमिक माहिती गोळा करताना सहकार चळवळीमुळे झालेल्या फायद्यांविषयी सर्व संबंधितांचे समान मत पडते. सर्वजण समाधानी असल्याचे जाणवले. उत्तर अहमदनगर जिल्ह्याच्या तुलनेत दक्षिणेतील लोकांना विकास कामाच्या संदर्भात डावलले गेल्याची खंत वाटते. त्याचप्रमाणे उत्तरेत सुध्दा सहकार चळवळीमुळे राजकारणात प्रभावी झालेल्या लोकांची घराणेशाही निर्माण होवून इतर गुणवंतांना संधी न मिळाल्याचा इतिहास सुध्दा दिसून येतो.

मुळातच अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा कणा म्हणून ओळखली जाणारी सहकारी चळवळ सन १९४८-४९ च्या दरम्यान अहमदनगरच्या उत्तर भागात सुरू झाली. तो भाग असा होता की, राहूरी, श्रीरामपूर, संगमनेर तालुक्यात प्रवरा आणि तिची उपनदी मुळा तसेच गोदावरी नदीच्या कालव्याचे पाणी पोहोचले होते. ऊस उत्पादन वाढून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली होती. त्यातूनच या लोकांचा राजकारणात प्रवेश झाला. नंतरच्या काळात सन १९५७ च्या दरम्यान अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची स्थापना झाली. या बॅंकेच्या अधिकार मंडळावर सुध्दा या लोकांचा भरणा अधिक झाला. बॅंक संपुर्ण जिल्ह्याची होती परंतु उत्तरेतील लोकांचे अधिराज्य असल्याने बॅंकेचे अधिक फायदे त्यांना मिळाले. मुळातच योजना अशा आखल्या गेल्या कि, त्यांचा फायदा सहकारी चळवळीच्या माध्यमातून श्रीमंत शेतकऱ्यानाच यांनाच मिळेल. अर्थात संबंधित योजना आखताना अशा प्रकारचा उद्देश

नसेल सुध्दा. परंतु दुर्दैवाने घडले मात्र तसेच. उदाहरणार्थ सन १९७२ नंतरच्या काळात अहमदनगर मध्यवर्ती बॅकेने कर्जदार शेतकऱ्यांसाठी एक योजना आखली. या योजनेनुसार थकीत कर्जाची रक्कम मुदतीच्या आत भरणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजदरात दोन टक्क्यांची सवलत देण्यात आली. याचा परिणाम नेमका असा झाला की, साखर कारखानदारीच्या पट्टयातील ओलिताखालील शेतकरी हे कर्ज मुदतीच्या आत फेडून या सवलतीचा लाभधारक ठरला. बॅकेची वसूली सुध्दा मोठ्या प्रमाणात झाली. तुलनेने दुष्काळी भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांना याचा लाभ होवू शकला नाही. कारण त्यांच्या जवळ पैसे नसल्याने ते वेळेत कर्जाचा परतावा करू शकले नाहीत आणि पर्यायाने या योजनेपासून वंचित राहिले.

जिल्ह्यातील सहकारी साखर कारखानदारी फोफावण्याच्या कामी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेचे फार मोठे योगदान झाले. सहकारी विज सोसायट्या सुध्दा प्रचंड मोठ्या झाल्या. या संस्थांना जिल्हा बॅक आणि सरकारकडून कोट्यावधी रुपयांची मदत झाली. या सर्व संस्था जिल्ह्याच्या सधन भागात असल्याने दुष्काळी भागातील शेतकरी सहकार चळवळ आणि सरकारच्या आर्थिक लाभापासून वंचितच राहिला. सहकार चळवळीमुळे अहमदनगर जिल्ह्याच्या एका भागातील शेतकरी ऊस उत्पादक, बागायतदार आणि साखर कारखानदार झाला. सहकार चळवळीने त्याला आणखी मदत केली आणि याच जिल्ह्याच्या दुष्काळी भागातील कोरडवाहू शेतकरी गळीपाच्या काळात उत्तरेतील शेतकऱ्यांचा ऊस तोडण्यासाठी रोजंदारीवर जावू लागला. यामधून संधी न मिळाल्याची खंत या लोकांच्या मनात निर्माण झाली.

सहकाराच्या माध्यमातून राजकारणात दाखल झालेल्या पुढाऱ्यांची स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य आणि केंद्र पातळीवरील सत्ता स्थानात वर्णी लागली. परिणामी केंद्र व राज्य सरकारकडून येणारा विकास निधी पुन्हा एकदा याच भागाकडे वळविला गेला. प्राथमिक माहिती संकलन करण्याच्या निमित्ताने सर्व जिल्ह्याचा प्रवास केला. साखर कारखानदारिच्या उत्तर भागाचा प्रवास करताना आपण अहमदनगर जिल्ह्यात नाहीच अशी शंका निर्माण झाली. कारण अत्यंत चांगले रस्ते, जागोजागी सरकारी अतिथी गृहे, पिण्याच्या पाण्याच्या सोयी उपलब्ध झाल्या. याउलट दक्षिणेत उखडलेले रस्ते, पाण्यासाठी फिरणाऱ्या स्त्रिया असे चित्र आपणास पहावयास मिळते.

अशाच प्रकारचा अन्याय महाराष्ट्रातील वीज बील आकारणीच्या इतिहासासंदर्भात दिसून आला. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना सधन भागातील शेतकऱ्यांनी मोर्चा आयोजित करून वीज वापराप्रमाणे असणारी वीज बिल आकारणी अश्वशक्ती नुसार करण्याचा निर्णय करणे सरकारला भाग पाडले गेले. अर्थात याबाबतील सुध्दा सहकाराच्या माध्यमातून जास्तीत जास्त समृध्दी असलेल्या भागाचा फायदा अधिक झाला. कारण ज्या भागात सहकाराच्या माध्यमातून जलसंधारणाची कामे झाली तेथील पाण्याची पातळी वाढली होती व त्या शेतकऱ्यांचे वीजपंप अखंड चालत होते. जिल्ह्यातील दुष्काळी भागाचे वीज पंप मात्र वर्षभर चालणे शक्य नव्हते. या प्रश्नातील शेतकऱ्यासाठी अश्वशक्तीवर वीज बिल आकारणी कशी योग्य आहे हे सरकारला पटवून देण्यात आले. वर्षभर, चोवीस तास पंप चालणाऱ्या लोकांच्या बरोबरीने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना वीज बिल आकारणी सुरू झाली. ही खंत प्रामुख्याते माहिती गोळा करताना जिल्ह्याच्या दक्षिण भागातील जाणकार सुशिक्षित आणि वयोवृध्द असणाऱ्या सहकार चळवळीत काम केलेल्या लोकांनी व्यक्त केली.

सहकाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. कित्येक सहकारी संस्थांची, प्रामुख्याने सहकारी साखर कारखान्यांची उलाढाल शेकडो कोटी रुपयांच्या घरात गेली. परिणामी या सस्थांवर ताबा मिळविण्यासाठी लोकांची त्यागाच्या वृत्तीतून राजकारणाकडे केव्हा

वाटचाल झाली हे कळलेच नाही. श्रीमंत सहकारी संस्थांचे नेतृत्व करणे आकर्षणाचे वाटू लागले. परिणामी सहकारी चळवळीतून राजकारणाने जन्म घेतला. सहकार कार्यकर्ते राजकारणी अधिक बनले अशी अवस्था नंतरच्या काळात निर्माण झाली. ज्यांच्या हाती सहकारी संस्थांचे नेतृत्व आहे त्यांनी स्वत:कडे आणि आपल्या नंतर आपल्याच कुटुंबात पिढीजात राहिल याचा अत्यंत चलाखीने विचार केला. पर्यायाने अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीत घराणेशाहीने जन्म घेतला. अत्यंत सुशिक्षित तसेच काम करण्याची इच्छा असणाऱ्या परंतु कौटुंबिक वारसा नसणाऱ्याना सहकार चळवळ आणि पर्यायाने राजकीय क्षेत्रात प्रवेश करणे कठीण होवून बसले.

अर्थात जगाच्या सामाजिक जीवनात आणि सांस्कृतिक इतिहासात डोकावले असता, प्रत्येक व्यवस्थेचे काही फायदे आणि तोटे दिसून येतात. अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळ याला अपवाद ठरणे शक्य नव्हते. त्यामुळे जिल्ह्यातील सहकार चळवळीमुळे जे अनेक फायदे झाले त्यांच्या पाठोपाठ काही तोटे येणे सुध्दा साहजिकच होते. या सर्व फायद्या-तोटयाबाबत कोणत्याही प्रकारे पुर्वग्रह दुषित दृष्टीकोण न ठेवता प्रस्तुत लेखिकेने प्राथमिक माहिती आणि ती माहिती संकलीत करण्यासाठी फिरताना आलेल्या अनुभवांच्या आधारे तटस्थपणे प्रामाणिक आढावा घेण्याचा प्रयत्न केला. अर्थात जिल्ह्यातील सहकार चळवळीत दोष जरी दिसून आले असले तरी, त्यांच्या तुलनेने लाभाचे प्रमाण कितीतरी पटीने अधिक असल्याने चळवळीत निर्माण झालेल्या या दोषांचे प्रमाण नगण्य ठरते. आणि त्यामुळे सहकार चळवळीला कोणतेही गालबोट निश्चितच लागत नाही.

**अनुमान:**

प्रस्तुत टिपणात प्रामुख्याने सहकारी चळवळीचा इतिहास आणि मानव जीवनाच्या विकासातील सहकार चळवळीने केलेल्या ऐतिहासिक योगदानावर लक्ष केंद्रीत केले आहे. यामध्ये प्रामुख्याने जगातील सहकार चळवळीची सुरूवात आणि चळवळीच्या विकासासाठी कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीच्या इतिहासाचा सुध्दा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीची उत्क्रांती आणि सहकार चळवळीने जिल्ह्यातील ग्रामीण जनतेच्या बहूविध विकासाच्या कामी जे योगदान दिले त्यांचाही सुत्रबध्द पध्दतीने इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. शास्त्रोक्त पध्दतीने संबंधित विषयावर अभ्यास केल्यानंतर सहकार चळवळीने समाज जीवनाच्या परिवर्तनाच्या कामी उल्लेखनिय कामगिरी इतिहासात पार पाडल्याबद्दल प्रस्तुत लेखिकेच्या मनात कोणतीही शंका उरली नाही. सहकारी चळवळीने मानव जीवनाच्या परिवर्तनाच्या कामी जे ऐतिहासिक योगदान केले आहे, ते एकमेवाद्वितीय असल्याचे सिद्ध होते. परंतु त्याचवेळी जेव्हा काही वयस्कर सुशिक्षित आणि अहमदनगर जिल्ह्याच्या सहकारी चळवळीत सुरूवातीपासून काम करणाऱ्या जाणकारांनी शंका उपस्थित केल्या त्यावळी मात्र आपल्याला अवघड परिस्थितीला सामोरे जावे लागते. कारण त्यांनी उपस्थित केलेल्या शंका अनपेक्षित स्वरुपाच्या तर होत्याच परंतु अनुभवाच्या आधारावर कटू सत्यतेच्या निकषांवर उतरणाऱ्या सुध्दा होत्या. त्यातील प्रमुख शंका म्हणजे सहकार चळवळीने समाजाच्या बहुविध विकासासाठी फार महत्वाचे काम केलेले असले तरी नंतरच्या काळात निर्माण झालेला नकळत स्वरुपाचा वर्ग कलह सुध्दा अहमदनगर जिल्ह्याच्या सहकाराचा इतिहास लिहिताना दुर्लक्षित करता येणे शक्य नाही.

दुसरा महत्वाचा प्रश्न किंवा शंका सुध्दा विचार करण्यास प्रवृत्त करणारा होता आणि तो प्रश्न म्हणजे सहकार चळवळीने ग्रामीण भागाच्या विकासासाठी जे योगदान दिले ते योगदान सधन क्षेत्रापुरतेच मर्यादित राहिल्याचा इतिहास सुध्दा दुर्लक्षून चालणार नाही. या संदर्भात असे दिसून येते की, ज्या भागात मोठ्या प्रमाणावर सरकारी प्रयत्नांतून पाणी पुरवठ्याच्या सुविधा

उपलब्ध झाल्या त्या भागात मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखानदारी उभी राहिली. परिणामी सहकारी चळवळ श्रीमंत होवून अनेक प्रकारच्या शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा घडून आल्या. सहकारी साखर कारखानदारीच्या माध्यमातून अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे परिवर्तन होत असताना सरकारी मदत आणि मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या आर्थिक मदतीचे स्थान अत्यंत महत्वाचे राहिले. परंतु दुर्दैवाने सुरूवातीच्या काळातील अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी चळवळ एका विशिष्ट भागापुरतीच मर्यादित राहिल्याने आर्थिक मदतीचा ओघ सुध्दा या भागाकडेच जास्तीत जास्त होत गेला, अर्थात तो भाग म्हणजे जिल्ह्याचा उत्तर भाग होय. काळाच्या ओघात सहकारी चळवळ अत्यंत श्रीमंत झाल्याने आणि चळवळीत काम करणाऱ्या लोकांचा जनसंपर्क वाढल्याने त्यांना राजकीय अधिष्ठाण प्राप्त झाले. सहकार चळवळीने उत्कृष्ट दर्जाचे राजकीय नेतृत्व निर्माण केले. परंतु श्रीमंत झालेल्या सहकारी चळवळीवर वर्चस्व प्राप्त करण्यासाठी आणि प्राप्त केलेले वर्चस्व टिकविण्यासाठी राजकारणाने चळवळीत केव्हा प्रवेश केला हे इतिहासाच्या लक्षात सुध्दा आले नाही. परिणामी राजकारणातून आर्थिक सत्तेचे स्वामित्व आणि आर्थिक श्रीमंतीच्या मदतीने राजकारण अशा प्रकारचे दुष्टचक्र समाज जीवनाच्या इतिहासात सुरू झाले त्याला सहकार चळवळ अपवाद राहू शकणार नव्हतीच.

राजकारणात प्रभुत्व टिकविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हा मानवी जीवनाचा स्थायी भाव असल्याने अहमदनगर जिल्हा त्याला अपवाद ठरणे शक्य नव्हते. यामधूनच जिल्ह्याचे राजकीय जीवन आणि सहकारी चळवळीत घराणेशाहीने नकळत प्रवेश केला. ज्या भागात सहकारी चळवळ फोफावली त्या भागात सुध्दा कौटुंबिक वारसा नसलेल्या हुशार लोकांना चळवळीच्या नेतृत्वावर प्रवेश करता आला नाही आणि ज्या भागात शेती सधनेच्या अभावी ग्रामीण सहकारी चळवळ फोफावू शकली नाही त्या भागातील समाजाला चळवळीच्या माध्यमातून सुधारीत झालेल्या समाजाकडून आर्थिक अस्पृश्यतेची वागणूक मिळाल्याचा इतिहास आणि वर्तमान सुध्दा मिळतो. सधन भागातील सहकारी चळवळीने लोकांच्यात नेतृत्व गुण विकसित केले परंतु राजकारणात आलेल्या या मंडळींना खूप स्पर्धा असल्याने स्वत:च्या भागात मतदार संघ सुध्दा कमी पडले. परंतु वेगवेगळ्या राजकीय पक्षात या लोकांचे वजन वाढलेले असल्याने त्यांना सरकारात प्रवेश मिळण्यासाठी जिल्ह्याच्या मागासलेल्या भागातून उमेदवारी देवून वेगवेगळी पदे बहाल करण्यात आली.

सुरूवातीच्या काळात सहकारी चळवळीच्या विकासासाठी सरकारी मदत घेतलेल्या लोकांनी राजकारणातील सत्ता पदे मिळाल्यानंतर त्यांचा उपयोग चळवळीच्या विकासासाठी केला. परंतु त्यामधून पुन्हा एकदा सरकारी मदतीचा ओघ सधन भागाकडे अधिक वळला. हे सर्व घटक लक्षात आल्यामुळे आवश्यक तेथे त्यांचा उल्लेख करणे जरूरीचे असल्यामुळे कटु अनुभव सुध्दा लिहिण्याचे टाळता आले नाही. परंतु यामुळे सहकारी चळवळीच्या यशाला मर्यादा येत नाही हे सुध्द निश्चित.

औद्योगिक क्रांतीच्या बरोबरीने इंग्लंडमध्ये सुरू झालेली सहकारी चळवळ नंतरच्या काळात जगाच्या वेगवेगळ्या देशात वेगाने पसरत गेली. पिळवणूकरहीत समाजाची रचना आणि लोकशाही पध्दतीने असणारे नियंत्रण हे घटक चळवळीच्या प्रसाराला कारणभूत ठरल्याचा इतिहास सापडतो. जगातील सहकारी चळवळीच्या इतिहासाचा अभ्यास करताना असे दिसून आले कि, हातमाग, विणकर, कारागिर, शेतकरी आणि शेतमजूर यांना सहकारी चळवळ आपल्या यशाची गुरूकिल्ली वाटली. इतर सर्व प्रकारच्या आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थांपेक्षा सहकारी तत्वावर आधारीत व्यवस्थापन पध्दती अधिक जवळची आणि आपली वाटली. सहकारी चळवळीच्या उत्क्रांतीच्या इतिहासात अनेक चढउतार झाल्याच्या नोंदी सापडतात. सन १९२९ च्या दरम्यान सुरू झालेल्या जागतिक महामंदीने तर संपूर्ण जगातील सहकारी चळवळीला फार मोठा धक्का दिला. अनेक प्राथमिक सहकारी संस्था बुडाल्या.

कित्येक जिल्हा मध्यवर्ती बँका दिवाळखोरीत निघाल्या. परंतु नंतरच्या काळात जगातील सर्वसामान्य जनतने पुन्हा एकदा आपला इतिहास घडवून आणल्याचा अनुभव आहे.

जगातील सहकारी चळवळीला आणखी एक मोठा धक्का सहन करावा लागल्याचा इतिहास आहे. तो धक्का म्हणजे जागतिक राजकारणाच्या क्षितिजावर हिटलरच्या हुकूमशाहीचा झालेला उदय. मुळात लोकशाहीवर विश्वास नसलेल्या नाझीवादाच्या काळात लोकशाही तत्वज्ञावर आधारीत असलेली सहकारी चळवळ फोफावणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुध्दाच्या कालखंडात सुध्दा सहकार चळवळीला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

**संकीर्ण नोंदी:**

भारताच्या संदर्भात सहकारी चळवळीचा इतिहास लिहीताना लॉर्ड कर्झनची आवठण झाल्याशिवाय राहत नाही. सन १९०४ साली लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली आणि भारतीय समाज जीवनात एक मोठे वादळ उठले. परंतु याच वर्षी ब्रिटीश सरकारने सहकार कायदा पास करून भारतातील सहकार चळवळीची विधीवत सुरूवात केली. सन१९०४ ते सन १९४६ या कालखंडात ब्रिटीश कालीन भारतीय सहकारी चळवळीचे पाच टप्पे पाडले जातात. सन १९२० साली ब्रिटीश सरकारने सहकार मंत्रालयाची स्थापना करून सहकार चळवळीच्या विकास कामात आणखी एक महत्वाचे पाऊल टाकल्याचा इतिहास आहे.

महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या इतिहासासंदर्भात विचार करताना विसाव्या शतकाच्या प्रारंभावर दृष्टीक्षेप टाकावा लागतो. या काळात महाराष्ट्रातील सहकार चळवळ जोमाने फोफावली. मुंबई परगण्याने सहकार क्षेत्रातील अनेक प्रकल्पांची प्रयोगशाळा म्हणून मोलाची कामगिरी पार पाडली. मुंबई प्रांताने सहकारी चळवळीच्या विकासाच्या अनेक योजना सरकारी पातळीवर हाती घेतल्या.

वैकुंठलाल मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील इत्यादींनी राज्यातील सहकारी चळवळ दृढ पायावर उभी केली. सन १९४८-४९ साली धनंजयराव गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे पाटील या द्वयीने सहकारी तत्वावर अशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा केला आणि महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यातील समाज जीवनाच्या परिवर्तनास सुरूवात झाली.

ब्रिटीश कालीन सरकारने केलेल्या पाणी पुरवठ्याच्या सुविधा आणि नंतरच्या काळात या सुधारणांचा वेग पुढे चालू राहिल्याने शेतीची उत्पादकता वाढून पीक पध्दतीत बदल झाल्याने सहकारी साखर कारखानदारीची चळवळ झपाट्याने फोफावली.

अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीने जिल्ह्याच्या बहुविध विकासाच्या कामी फार मोलाचे योगदान दिले. पुर्वीपासून दुष्काळाच्या सावटाखाली असणारा जिल्हा सहकारी चळवळीच्या माध्यमातून आमुलाग्र बदलला. सहकारी साखर कारखानदारीमुळे झालेला विकास हा कोणा एका व्यक्तिचा किंवा व्यक्तिंच्या गटाचा विकास नव्हता, तर तो आजुबाजूच्या सर्व परिसराचा विकास होता.

## संदर्भसूची:

1. A.M. Khusro and A.N. Agrawal (1961), The Problem of Co-Operative Farming in India, Asia Publishing House, Delhi, 1961.
2. B. S. Bhatiya (Ed), H. L. Verma and Garg (1994), Encyclopaedia of Co-operative Management, Deep and Deep Pub. Delhi, 1994.
3. Baidyanath Mistra (Ed/1967), Co-Operative Movement in India, A.P.H. Pub Co-Operations, Delhi, 1977.
4. Balwinder Singh (2000), Agricultural Credit Sources Problems and Emerging Issues, Deep & Deep Publications Pvt. Ltd, New Delhi, 2000.

**5.** David W. Rasmussen and Charles T. Haworth (1973), The Modem City Reading in Urban Economics, Harper and Row Publishers, New York, 1973.
**6.** G. Chufrin (1976), Economic Co-Operation and Collective Security in Asia, Vikas Publishing House Pvt Limited, New Delhi, 1976.
**7.** H. Laxminarayan and Akissen Kanungo (1967), Glimpses of Co Cooperative Farming in India, Asia Publishing House Bombay, 1967.
**8.** H. Laxminarayan and Kissen Kanunge (1967), Glimpses of Co-Operative Farming in India Asia Publishing House, New York 1967.
**9.** Hough (1966), The Co-Operative Movement in India, Oxford, Calcutta,1966.
**10.** Jacob L. Reddix (1936), The Nigro Seeks Economic Security Through Co-Operation, An Address Delivered Before the National Seminar on Consumers Co-Operation of The Federal Council of Churches of Christ In America, Indianapolis, Ind-January 1st 1936, Published, Central State Co-Operative League, 3954, West 27th Street, Chicago Illinois, 1936.
**11.** John Mathai Agricultural (1925), Co Operation in India Christian Literature Society for India, Madras 1925.
**12.** K. F. Svardstrom (1969), Agricultural Marketing for Co-Operators Allied Publishers New Delhi, 1969.
**13.** K. Madhava Das (1960), Co Operative Movements in India, Oxford University Press, Amen House, London 1960.
**14.** K. N. Naik And C. N. Vakil (1953), Co-Operative Movement in The Bombay State, The Popular Book Depot, Bombay 1953.
**15.** K. P. Bhatnagar, Dr. N. S. Nigam, Bhangoliwala and Hajela (1970), Co-Operation in India and Abroad, Kishore Pub House, Kanpur, 1970.
**16.** K. S. Gupte, Shri Bongirwar (1962), The Maharashtra Social: Aspect of Small Industries in India. UNESCO Research Center, University Enclave Delhi - 1962.
**17.** M. D. Vidwans (1962), The Maharashtra Co-Operative Society Act 1960, Co-Operator Book Depot, Bombay, 1962.
**18.** Maharashtra State Gazetteers, Ahmednagar District (Revised Edition) Gazetteers Department, Government of Maharashtra, Bombay, 1976.
**19.** Margaret Digby (1948), The World Co-Operative Movement, Hutchison University Library, London, 1948.
**20.** N. Choubey (1968), Principle and Practice of Co-Operative Banking in India Asia Publishing House, New York, 1968.
**21.** N. G. Bapat (1973), Economic Development of Ahmednagar District 1880-1960 Progressive Corporation, Bombay 1973.
**22.** N. R. Inamdar (1965), Govt And Co-Operative Sugar Factories Popular Prakashan, Bombay, 1965
**23.** P. Sinha (1992), Co Operation Instrument for Socio-Economic Justice, Himalaya Pub, Delhi, 1992.
**24.** P. Y. Chincharkar and M. V. Namjoshi (Ed/1977), Co-Operation and The Dynamics of Change, Somaiya Pub, Delhi, 1977.
**25.** P. Y. Chindhankar and M. V. Namjoshi (1977), Co-Operation and The Dynamics of Change Somiya Publications Pvt. Ltd., Bombay, 1977.
**26.** R. B. Tyagi (1915), Recent Trends in The Co-Operative Movement in India Bombay, 1915.
**27.** R. D. Bedi (1958), Theory, History and Practice of Co-Operation - Loyal Book Depot, Meerut, 1958.
**28.** R. Gadgil (1952), Sugar Co-Operatives Ltd. In Maharashtra, Published by National Federation of Co-Operative Sugar Factories, New Delhi, 1952.

**29.** R. P. Kurulkar (1983), Agricultural Finance in A Backward Region, Himalaya Publishing House Bombay, 1983.
**30.** Radha Kamal Mukherjee (1926), Rural Economy of India, Longmans Green and Co. Ltd, London, 1926.
**31.** Radhe Shyam (1970), The Rise of Business Co-operation in India, The Syndics Cambridge, The University Press, London, 1970.
**32.** Ranghubans Dev Bedi (1958), Theory History and Practice of Co Operation Loyal Book Dept, Meerat-24, 1958
**33.** Robin Marries and Abrian Wood, E. M. Houghs (1971), The Co-Operate Economy Growth Competition and Innovative Protentional Harvard University Press, Cambridge, 1971.
**34.** S. C. Mehata and Shriman Narayan (1964), Consumer Co-Operation in India Atmaram and Sons, Delhi 1964.
**35.** S. K. Iyengar (1961), A Study of The Co-Operative Movement in India: Facts-Theory-Policies, Current Book House, Bombay, 1961.
**36.** S. L. Goel and B. B. Goel (1979), Principles, Problems and Prospects of Co-Operative Administration Sterling Publishing Pvt Ltd, New Delhi, 1979.
**37.** Sabade and Namjosh (1977), Chamber of Commerce and Trade Associations in India, Shubhada Sarswat Publication, Pune, 1977.
**38.** Tarkateerth Laxmanshastri Joshi (1985), Marathi Encyclopedia (Vishwakosh), Vol. II, Maharashtra State Marathi Encyclopedia (Vishwakosh) Production Corporation, Mumbai, 1985.
**39.** V. Malyadri (1975), Socio Economic Impact of Sugar Co-Operation, Commerce Publication, 1975.
**40.** V. Tirupati Naidu (1968), Farm Credit and Co-Operatives in India, Vora And Co. Pub Alahabad, 1968.
**41.** Vaikunth Mehata (1942), A Plea for Planning in Co-Operation, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, R. R. Kale Memorial Lecture, 1942.
**42.** W. A. Robson [(Ed) (1948)], Margaret Digbay, The World Co-Operative Movement, Hutchinson University Libras, London, 1948.
**43.** W. C. Shrishrimal (1978), Co-Operative Economy-Problems and Potentialities, the Maharashtra State Co-Operative Bank Ltd, 1978.